मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
»पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
»नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
»वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » बुधवार, १९ मार्च २०२५ » वर्ष: ६ » अंक:९१ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## सिताराम घनदाट भाजपात सामील

मुंबई, दि. १८ वृत्तसंस्था

परभणी: विधानसभा निवडणुकांपूर्वी विविध पक्षात इनकमिंग-आऊटगोईंग सुरू होते. निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमध्ये सामील होण्यासाठी कार्यकर्त्यांसह आजी-माजी नेत्यांची रांग लागली. मागील अनेक दिवसांपासून भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेत पक्षप्रवेश सुरुच आहेत. यातच आता मराठवाड्यातून एक मोठी माहिती समोर आली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेडचे माजी आमदार आणि सहकार क्षेत्रातील दिग्गज सिताराम घनदाट(मामा) यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमधून वंचित बहुजन आघाडीत शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश केलेले माजी आमदार आणि अभ्युदय बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम घनदाट भाजपात सामील झाले आहेत. सिताराम घनदाट यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यांच्यासोबत वंचितकडून पाथरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलेले सुरेश फड हेदेखील भाजपमध्ये सामील झाले आहेत.

# नागपूर दंगलीत सुनियोजित पॅटर्न - मुख्यमंत्री

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

सोमवारी दोन गटांत निर्माण झालेल्या तणावामुळे नागपूरमध्ये दंगल झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यामध्ये अनेक वाहनांची जाळपोळ करण्यात आली. तसेच, या दंगलीत तब्बल ३३ पोलीस जखमी झाले असून त्यात तीन डीसीपी दर्जाचे अधिकारी असल्याची बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आज यासंदर्भात विधानसभेत केलेल्या निवेदनात अधोरेखित केली. यावेळी नागपूरमध्ये घडलेल्या दंगलीमध्ये एक सुनियोजित पॅटर्न दिसून येत असल्याचं सूचक विधान देवेंद्र फडणवीसांनी केले.



नागपूर दंगलीमध्ये तीन डीसीपी जखमी झाले असून त्यातील एकावर चक्क कुऱ्हाडीनं वार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यावर फडणवीसांनी विधानसभेत निवेदन देताना इशारा दिला आहे. पोलिसांवर हल्ला करणारे जे कुणी असतील, त्यांना सोडणार नाही, असं देवेंद्र फडणवीस विधानसभेत म्हणाले आहेत.

"या घटनेत एक क्रेन, दोन जेसीबी व काही चारचाकी वाहने जाळण्यात आली. या संपूर्ण घटनेत ३३ पोलीस जखमी झाले आहेत. त्यात तीन उपायुक्त दर्जाचे पोलीस आहेत. त्यातल्या एका उपायुक्तावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे. एकूण ५ नागरिक जखमी झाले आहेत. तिघांवर उपचार करुन घरी सोडण्यात आले आहे. दोन रुग्णालयात आहेत. त्यापैकी एक आयसीयूत आहे", अशी माहिती फडणवीसांनी दिली.

"एकूण तीन गुन्हे गणेशपेठ पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. तहसील पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. असे एकूण पाच गुन्हे आहेत. ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. एंट्री पॉइंटवर नाकाबंदी करण्यात आली आहे. त्यात तहसील, कोतवाली, गणेशपेठ, पाचपावली, लकडगंज, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोदरानगर, कपिलनगर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. एसआरपीएफच्या पाच तुकड्या इथे तैनात करण्यात आल्या आहेत", असंही फडणवीसांनी नमूद केले.

## पोलिसांवरील हल्ले सहन केले जाणार नाही

दरम्यान, नागपूरमधील प्रकार हा सुनियोजित पद्धतीने घडल्याचा दावा देवेंद्र फडणवीसांनी यावेळी केला. "सकाळची एक घटना घडल्यानंतर पूर्णपणे शांतता होती. त्यानंतर संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक असा हल्ला केल्याचं समोर येतंय. कारण जवळपास एक ट्रॉलीभरून दगड सापडले आहेत. काही लोकांनी घरांवर जमा करून ठेवलेले दगड पाहायला मिळाले. शस्त्रंही मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आली आहे. वाहनांची जाळपोळ झाली आहे. ठरवून काही ठराविक घरांना, आस्थापनांना लक्ष्य करण्यात आलं आहे. त्यामुळे यात काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न दिसतोय", असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

"अशा लोकांवर कारवाई केली जाईल. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याची कुणालाही परवानगी दिली जाणार नाही. एक नक्की सांगतो, पोलिसांवर ज्यांनी कुणी हल्ला केला असेल, त्यांना काहीही झालं तरी सोडलं जाणार नाही. पोलिसांवरचा हल्ला सहन केला जाणार नाही. पोलीस शांतता प्रस्थापित करत होते. अशा वेळी पोलिसांवर केलेला हल्ला चुकीचा आहे. महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्था राखणं ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे. मी सर्व जनतेला विनंती करू इच्छितो की सर्व समाजांचे धार्मिक सण या काळात चालले आहेत. अशा परिस्थितीत सगळ्यांनी संयम ठेवायला हवा. अशा वेळी आपल्याला कायदा व सुव्यवस्था कशी राखता येईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा", असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.





### 'छावा' चित्रपटाचा मुख्यमंत्र्यांनी केला उल्लेख!

नागपूर दंगलीबाबत माहिती देताना देवेंद्र फडणवीसांनी निवेदनाच्या शेवटी 'छावा' चित्रपटाचा उल्लेख केला. "मला कुठल्या चित्रपटावर टीका करायची नाहीये. आज महाराष्ट्रात 'छावा' या चित्रपटाने संभाजी महाराजांचा खरा इतिहास आपल्यासमोर आणला. पण त्यानंतर राज्यात लोकांच्या भावनाही मोठ्या प्रमाणावर प्रज्वलित झाल्या आहेत. औरंगजेबाबद्दलचा रागही मोठ्या प्रमाणावर बाहेर येतोय. पण हे सगळं जरी असलं, तरी महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्था राखणं अत्यंत महत्त्वाचं आहे", असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अग्राग्रलेख खरीखरी

### काँग्रेसपुढील यक्षप्रश्न

परवा राहुल गांधी यांनी गुजरातच्या आपल्या कार्यकर्त्यांसमोर भाषण केले. भाषण करताना काँग्रेसच्या नेत्यांमध्ये अनेक लोक भाजप सोबत हातमिळवणी करणारे आहेत. असा आरोप राहुल गांधी यांनी केला. यापूर्वी हा आरोप करणारे काँग्रेसच्या बाहेरचे पण काँग्रेसचे हितचिंतक असलेले अनेक लोक होते. पण राहुल गांधी यांनी असा आरोप करणे अभूतपूर्व आहे. आजच्या घडीला राहुल गांधी काँग्रेसचे अघोषित नेते आहेत. मल्लिकार्जुन खरगे राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष असले तरी राहुल गांधी काय बोलतील किंवा त्यांचे विचार कोणते आहेत. यावरूनच त्यांची भाषा उच्चारली जाते. सोनिया गांधी यांनी आता जवळजवळ निवृत्तीच घेतलेली आहे. त्यांच्या एवजी प्रियंका गांधी सध्या अधिक कार्यरत आहेत खासदार झाल्यावर तर त्यांच्या नेतृत्व गुणांची प्रचिती सर्वांनाच आलेली आहे. पण काँग्रेसला जो आजार जडलेला आहे. त्याचे औषध कुणाकडेही दिसत नाही. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी जबरदस्त प्रचार यंत्रणा राबवली. त्यामुळे काँग्रेसला शंभर जागा जिंकता आल्या. पण ज्याप्रमाणे एनडीए मधील दादागिरी मोदी आणि शहा यांच्याकडेच आहे. तशी स्थिती इंडियात आहे काय. इंडियातील अनेक घटक पक्षांना काँग्रेस म्हणजे अडथळा वाटतो. दुसरे म्हणजे पश्चिम बंगालच्या बाहेर कोणीही विचारत नसले. तरी ममता बाईंना इंडियाची नेतृत्व आपल्याकडे यावे असे वाटते. तिसरी गोष्ट म्हणजे इंडिया आघाडीतील आम आदमी पार्टीने काँग्रेसला हरवण्यासाठी अनेक राज्यात आपले उमेदवार मोठ्या संख्येने उभे केलेले होते. गुजरात आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पराभवाचे विश्लेषण केल्यावर, काँग्रेससाठी आम आदमी पार्टी खलनायकी भूमिकेतच दिसून आली. उत्तर प्रदेश आणि बिहार मधील यादव कंपनीचे अजूनही तळ्यात-मळ्यात सुरू आहे. राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते आहेत. पण त्यांचे नेतृत्व सर्व घटक पक्षांना मान्य आहे काय, हा सुद्धा मोठा यक्षप्रश्न आहे. आताच्या घडीलाही काँग्रेस पक्षाकडे जवळ जवळ 20% मते आहेत. त्यातही थोडाफार फरक होत असेल. तरीही 20% मते म्हणजे काही कमी नसतात. 1984 च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या मतदानामध्ये काँग्रेसने 48% पेक्षा जास्त मते मिळवली होती. लोकसभेच्या जवळपास सव्वा चारशे जागांवर काँग्रेसचे खासदार होते. त्यावेळी भारतीय जनता पक्षाजवळ केवळ दोन खासदार होते. त्यानंतर भारतीय जनता पक्षाने हिंदुत्व, राम मंदिर, वगैरेंसारखे जनमानसाच्या हृदयाला भिडणारे विषय घेऊन आपल्या पक्षाच्या विचारांची रणनीती आखली. अटलजींच्या हाती अनेक पक्षांच्या सहमतीने सत्ता आली. 2014 सालामध्ये मात्र भारतीय जनता पक्षाने स्वतःच्या बळावर बहुमत मिळवले आणि आताही काँग्रेसपेक्षा अडीचपट जास्त जागा घेऊन भारतीय जनता पक्ष सत्तेत सत्तारूढ आहे. आता भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनंतर काँग्रेसच्या विचारधारेबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे. लोकशाही, मानवाधिकार, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि सर्वधर्मसमभाव ही काँग्रेसची घोषित नीती होती. पण 1977 पूर्वी काँग्रेसकडे जे जनतेचे समर्थन होते. ते पुढे अनेक वेळा डगमगू लागलेले होते. आता तर काँग्रेस मधील बडेबडे नेते भाजप शरण झालेले आहेत. काही उघडपणे तर काही काँग्रेस पक्षात राहूनही राहुल गांधी म्हणतात, त्याप्रमाणे भाजपा बरोबर हातमिळवणी किंवा मानसिक मित्रता ठेवतात. त्यामुळेच काँग्रेसला स्वबळावर उठून उभे राहायचे असेल. तर खालपासून वरपर्यंत संपूर्ण परिवर्तन करावे लागेल. जयप्रकाश नारायण यांनीही आणीबाणीच्या काळात संपूर्ण क्रांतीचा नारा दिला होता. पण त्यांचे प्रयत्न सुद्धा अल्पकालीनच ठरले. केवळ अडीच वर्षातच जनता सरकार पडले आणि काँग्रेसने पुन्हा आपले सरकार निवडून आणले. पण आता पुढील महिन्यात काँग्रेसचे अधिवेशन गुजरात मध्ये होत आहे. त्या अधिवेशनात काँग्रेसला स्वतःला बदलविण्यासाठी जे उपाय करायचे आहेत. ते करण्यासाठी काँग्रेसची तयारी आहे काय, भारतीय जनता पक्षाच्या रणनीतीला आणि धनशक्तीला पुरून उरेल असे काँग्रेस जवळ काय आहे. यामुळेच आता तरी काँग्रेस वर्किंग कमिटीने कितीही गमजा केल्या तरी स्वबळावर सत्ता मिळणे अशक्य आहे. संपूर्ण गांधी परिवाराला आता राहुल गांधी यांच्याप्रमाणेच जनतेत मिसळावे लागेल. नवे नेतृत्व उभे करावे लागेल. जागोजागी नव्या नेतृत्वाच्या फळीला चालना द्यावी लागेल. पक्षातील घोषित किंवा अघोषित मठाधीशांना दूर सारावे लागेल. पण हे शक्य होईल काय, हाच काँग्रेसचा समोरचा यक्षप्रश्न आहे. एकूणच दीड शतकाच्या जवळपास जिवंत असलेल्या काँग्रेसला यापुढे सत्ताप्राप्ती न झाल्यास मोठा बाका प्रसंग उद्भवू शकतो. गांधी बंधू-भगिनींनी या धोक्याकडे गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# समाजकंटकांना सोडणार नाही

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा तीव्र शब्दात इशारा

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

नागपूरमधील जमावाने घडवलेल्या दंगलप्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. "ही घटना पूर्णपणे पूर्वनियोजित वाटते. मोबिनपुरा परिसरात नेहमी गाड्या असतात, पण काल तिथे कुठलीही गाडी नव्हती, यावरून हे स्पष्ट होतं," असे शिंदे म्हणाले.

"जमावाने घरांवर हल्ले केले, जाळपोळ केली, मोठ्या प्रमाणात मालमत्तेचं नुकसान केलं. काही जणांना जीव वाचवावा लागला. पोलिसांवर दगडफेक झाली, काहींवर कुऱ्हाडीने हल्ला झाला. अग्निशमन दलाच्या जवानांवरही हल्ला करण्यात आला. हे सगळं अत्यंत दुर्दैवी आहे," असे ते म्हणाले.

"काही मंदिरांतील फोटो जाळण्यात आले, ही अत्यंत गंभीर बाब आहे. पोलिस मुळाशी जाऊन तपास करतील आणि दोषींना शोधून कठोर कारवाई केली जाईल," असा इशाराही त्यांनी दिला

नागपूर येथे घडलेल्या हिंसाचाराबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत निवेदन दिले. नागपूरमध्ये सोमवारी नेमके काय घडले? याची माहिती देत असताना त्यांनी अबू आझमी यांनी औरंगजेबाबद्दल केलेल्या विधानाचा उल्लेख करत त्यांच्यावरही टीका केली. तसेच विधानपरिषदेतील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार अनिल परब यांनी केलेल्या वक्तव्याचा उल्लेख केला. यानंतर त्यांनी आक्रमक होत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षावर जोरदार टीका केली. "२०२२ साली मी लपूनछपून काहीही केले नाही, जे केले ते निधड्या छातीने केले. पण तुमचे नेते (ठाकरे गट) लपूनछपून भाजपा श्रेष्ठींना भेटून आले. युती करू असे म्हणाले. पण पुन्हा पलटले", असी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.



शिवसेनेचे (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी काही दिवसांपूर्वीच विधानपरिषदेत बोलत असताना माझा छत्रपती संभाजी महाराजांप्रमाणेच छळ झाला होता, असे म्हटले होते. पक्ष बदलण्यासाठी माझा छळ झाला. पण जसे छत्रपती संभाजी महाराजांनी धर्म बदलला नाही, तसा मी पक्ष बदलला नाही, असे ते म्हणाले होते. याचा संदर्भ देत एकनाथ शिंदे म्हणाले, "तुमचा काय छळ झाला होता? तुमच्यावर कारवाई झाल्यानंतर तुम्हीही लोटांगण घातले होते, ही मला माहीत आहे. पण प्रकरणातून सुटका झाल्यानंतर तुम्ही तुमच्या नेत्यांप्रमाणेच पलटी मारली."

एकनाथ शिंदे यांनी पुढे म्हटले, "छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने हाल हाल करून मारले. त्यांचे डोळे काढले, जीभ हासडली, कातडी सोलली, त्यावर मिठ चोळले, अशाप्रकारचे तुमच्यावर (विरोधक) अत्याचार झाले का? तुम्ही सत्तेसाठी लाचारी पत्करली. मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीसाठी युती तोडली. तसेच महाविकास आघाडीचे सरकार असताना भाजपाच्या चार नेत्यांना तुरुंगात टाकून त्यांचे आमदार फोडण्याचा तुमचा कट होता. पण मी युतीधर्मासाठी आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांसाठी तुमचा टांगा पलटी केला. मी जे केले, ते उघडपणे केले. ज्याची जगातील ३३ देशांनी दखल घेतली. एकनाथ शिंदे कोण आहे, हे ३३ देशांमध्ये सर्च केले गेले." दरम्यान नागपूर दंगलीबाबत बोलत असताना त्यांनी विधानसभेत दिलेली माहितीच पुन्हा दिली. ही दंगल पूर्वनियोजित होती, असे प्रत्यक्षदर्शींकडून पुरावे मिळत असल्याचे ते म्हणाले.

# गृहखात्याला याची पूर्व कल्पना नव्हती का?- उद्धव ठाकरे

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

नागपूरची दंगल पर्व नियोजीत होती असे म्हंटले जाते. असे असेल तर गृहखात्याला याची पूर्व कल्पना नव्हती का? आधीच ही दंगल रोखण्याचा प्रयत्न का केला नाही असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. डबल इंजिन सरकार नुसतं वाफा सोडण्याचे काम करत आहे.गुजरात मध्ये जन्मालाला आलेल्या औरंगजेबला महाराष्ट्र जिंकता आला नाही. औरंगजेबच्या कबरीला केंद्र सरकरचं संरक्षण आहे. भाजप आणि केंद्र सरकला विचारले पाहिजे औरंगजेब तुमचा कोण लागतो? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रातून औरंगजेबची कबर हटवण्याची मागणी करावी. अफजल खान, औरंगजेब यांच्या कबरी हे शौर्याचे प्रतिक आहे. ही थडगी हटवायची असेल तर तात्काळ यावर कारवाई करावी असे उद्धव ठाकरे म्हणाले.



राज्यात दंगली का घडवल्या जात आहेत ? असा थेट प्रश्न राऊतांनी उपस्थित केलाय. इतकंच नाही तर सरकार तुमचं आहे ना? असा सवाल उपस्थित करून मोहन भागवत, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार या चार लोकांनी हाता कुदळ -फावडं घेऊन जावं आणि त्यांच्या लोकांची जी इच्छा पूर्ण करावी, असं आव्हानही राऊतांनी सरकारला दिलंय..यावेळी औरंगजेबची कबर ही शिवरायांच्या शौर्याचं प्रतिक असल्याचंही राऊत म्हणालेत.

# शिवरायांची तुलना कोणाशीच होऊ शकत नाही : खा. उदयनराजे

सातारा, दि. १८ प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड हिदुस्थानचे दैवत आहेत. शिवरायांची तुलना कोणाशीच होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकशाहीचा पाया घातला. त्यांच्या सैन्यामध्ये अनेक समाजाचे मावळे होते. अनेक मुस्लीमही त्यांच्या सैन्यात होते. मात्र काल नागपुरात जी घटना झाली आहे. ती निंदास्पद आहे. या घटनेतील आरोपींना कडक शिक्षा झाली पाहिजे. तसेच महापुरूषांचा अपमान करणाऱ्यांवरही कडक कारवाई झाली पाहिजे. यासाठी कायदे केले पाहिजेत अशी भूमिका खासदार उदयनराजे भोसले यांनी मांडली. काल नागपूरमध्ये दोन समजात उसळलेल्या हिंसाचारामध्ये मोठ्या प्रमाणात तोडफोड झाली आहे. या हिंसाचारात अनेक पोलिस अधिकारीही जखमी झाले आहेत. त्यावर पत्रकार परिषदेत खासदार उदयनराजे भोसले बोलत होते.



महापुरूषांचा अपमान करणाऱ्यांना कडक शिक्षा व्हायला हवी. त्यासाठी कायद्यात बदल करणं गरजेचं. शिवरायांचा अपमान करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे म्हणत उदयनराजे यांनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसने लोकांमध्ये व्देश पसरवण्याचं काम केलं. औरंगजेब महाराष्ट्राचा घास घ्यायला आला होता. त्याने महाराष्ट्रावर आक्रमण केलं. इथे येउन मंदिरांची तोडफोड केली. नासधूस केली. इथला सामाजिक सलोखा बिघडवला. त्यामुळे त्याचे उदात्तीकरण करणे योग्य नाही. नितेश राणे यांच्यावर बोलताना त्यांनी भावनेच्या भरात वक्तव्य केलं असेल. सध्या राजीनामा मागणे ही फॅशन झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव व्यक्तिमत्व होते की, ज्यांनी सर्वधर्म समभावाचा विचार दिला. लोकशहीचा ढाचा रचण्याच काम शिवाजी महाराज यांनी केलं. त्यामुळं त्यांची तुलना कोणासोबत होऊ शकत नाही. नरेंद्र मोदी, भाजप पक्षाने शिवाजी महाराज यांचे विचार आचरणात आणण्याच काम केलं, एक व्यक्ती म्हणून मी हे सांगतो नागपूरच्या दंगलीच कोणीच समर्थन करू शकत नाही.

सर्वधर्म समभावचे विचार देशाला पुढे घेवून जातात. राज्य सरकार आणि केंद्र सरकारने लवकरात लवकर शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा शाशन मान्य असणारा इतिहास प्रकाशित करावा म्हणजे वाद होणार नाही.

तो काही संत नव्हता. त्यामुळे त्याच्या कबरीच उदात्तीकरण होता कामा नये. त्याची कबर काढून देशाबाहेर टाकली पाहिजे अशी कणखर भूमिका त्यांनी मांडली.

# विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

विधानपरिषदेची 5 जागेसाठी होणारी निवडणूक अखेर बिनविरोध होणार आहे. विरोधकांकडून कोणताही अर्ज आला नसल्यामुळे महायुतीचे 5 उमेदवार विधानपरिषदेत बिनविरोध निवडून जातील. विधानपरिषद पोटनिवडणुकीत भाजपच्या वाट्याला तीन जागा आल्या आहेत. तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रत्येकी एक जागा लढवणार आहे. भाजपच्या तिघांची आमदारकीची मुदत मे 2026 पर्यंत आहे. महायुतीकडून विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी आलेल्या अर्जांची आज विधिमंडळात निवडणूक अधिकाऱ्यांकडून पडताळणी पार पडली. यामध्ये सर्व अर्ज वैद्य ठरले. तर एक अपक्ष अर्ज या निवडणुकीत दाखल झाला होता पण या अर्जावर आमदारांची सही नसल्यामुळे तो अर्ज बाद ठरवण्यात आला. भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. तर शिवसेनेनं चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं संजय खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. विरोधकांकडून विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी कोणताही अर्ज न आल्यामुळे ही निवडणूक आता बिनविरोध होणार आहे.

# प्रशांत कोरटकरला न्यायालयाचा दणका जामीन अर्ज फेटाळला

कोल्हापूर, दि. १८ प्रतिनिधी

प्रशांत कोरटकर याचा जामीन अर्ज कोल्हापूर सत्र न्यायालयाने आज फेटाळला. शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत कोरटकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सोमवारी जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. व्ही. कश्यप यांच्यासमोर सुनावणी झाली होती, मात्र याचा निकाल राखून ठेवण्यात आला होता. आज सत्र न्यायालयाकडून कोरटकरचा जामीन अर्ज नामंजूर करण्यात आला. या निकालाकडे कोल्हापूर जिल्हासह राज्यातील शिवप्रेमींचे लक्ष लागले होते. प्रशांत कोरटकर याने आठवड्यात कोल्हापूर येथील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना मोबाईद्वारे संपर्क साधून त्यांना एकेरी भाषेत शिवीगाळ आणि छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केले होते.

# भाजपाला महाराष्ट्राचा मणिपूर करायचा आहे - आदित्य ठाकरे

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

औरंगजेबाच्या कबरीला हटविण्यावरून नागपुरातील महाल परिसरात सायंकाळी तरुणांच्या दोन गटांत भीषण राडा झाला. यातून वातावरण तापले व मोठा जमाव रस्त्यांवर उतरला. यात काही असामाजिक तत्त्वांनी जाळपोळ केली व पोलिसांच्या दिशेने दगडफेक करत धक्काबुक्की केली. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. दगडफेकीत १५ पोलिस जखमी झाल्याचे वृत्त असून रात्री उशिरापर्यंत धरपकड मोहीम राबवत पोलिसांनी अनेक तरुणांना ताब्यात घेतले. यावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू असून, ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर टीका केली.



विधान भवनात पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, नागपूरमध्ये हिंसाचाराची घटना घडली. मला एक प्रश्न पडला आहे की, मुख्यमंत्री कार्यालयाकडून का काही प्रतिसाद किंवा माहिती देण्यात आली नाही. जेव्हा अफवा पसरवल्या जात होत्या, तेव्हा मुख्यमंत्री कार्यालयाने का कोणती प्रतिक्रिया दिली नाही. मुख्यमंत्री कार्यालयाचे काम मी अगदी जवळून पाहिले आहे. जेव्हा राज्यात कुठेही अशी घटना होते, तेव्हा मुख्यमंत्री कार्यालयाला माहिती येते. एक अहवाल येतो. गृह विभागालाही माहिती आणि रिपोर्ट येतो. या विभागांना असे काही होणार आहे, याची कल्पना आली नाही का? नागपूर हे तर मुख्यमंत्री महोदयांचे शहर आहे. ते मुख्यमंत्रीही आहेत आणि गृहमंत्रीही आहेत.

माझा असा अंदाज आहे की, भाजपाला महाराष्ट्राचा मणिपूर करायचा आहे. गेल्या वर्षभरात मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. कोणाला जाळले जात आहे, कोणाला मारून टाकले जात आहे. आता तिथे कोणती गुंतवणूक जाऊ शकेल का, कोणी पर्यटनाला तिथे जाऊ शकेल का, याचे उत्तर नाही असेच आहे. हेच आता त्यांना महाराष्ट्रात करायचे आहे. महाराष्ट्रातही तशीच परिस्थिती त्यांना निर्माण करायची आहे. जिथे भाजपाला सत्ता राबवता येत नाही, तिथे दंगली घडवण्याचे काम केले जाते, अशी जोरदार टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

# समाजात फूट पाडण्याचा भाजपचा डाव - अंबादास दानवे

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

नागपूरमध्ये घडलेल्या दंगलप्रकरणी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर तीव्र टीका केली आहे. "मी विरोधक म्हणून नाही, तर राज्याचा नागरिक म्हणून बोलत आहे. नागपूरचे मुख्यमंत्री असूनही आणि गृहखातं स्वतःकडे असताना ही घटना घडते, यावरून गुप्तचर यंत्रणा झोपल्या होत्या का, असा प्रश्न निर्माण होतो," असे दानवे म्हणाले.



"राज्यात प्रशासनावर आणि गृहखात्यावरचा वचक राहिलेला नाही. ज्या पद्धतीने वातावरण बिघडवले जात आहे, ते अतिशय गंभीर आहे. समाजात फूट पाडण्याचं काम सुरू आहे आणि सरकारच यामागे असल्याचा स्पष्ट संदेश यातून मिळतो," असा आरोप त्यांनी केला.

"अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्यावर अद्याप कारवाई झालेली नाही. यावरून सरकारचा उद्देश स्पष्ट होतो. समाजात तणाव निर्माण करणे आणि त्यातून राजकीय पोळी भाजणे हे भाजपचं काम सुरू आहे," असे दानवे म्हणाले.

"भाजपच्या बगल बच्च्यांनी वातावरण चिघळवण्याचं काम केलं आहे. भाजप, बजरंग दल, विहिंप, संघटनेतील लोकांच्या वक्तव्यावरूनही हेच दिसून येत आहे की, समाजात फूट पाडण्याचा डाव रचला जात आहे. नितेश राणे एकटेच नाहीत, हे सगळेच यात सामील आहेत," अशी टीकाही अंबादास दानवे यांनी केली.

"हे थांबवायचं असेल तर सरकारने तातडीने कठोर भूमिका घ्यावी," अशी मागणी त्यांनी केली.

# कोकाटे यांना उच्च न्यायालयाचाही दिलासा

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक येथील दंडाधिकारी न्यायालयाने खोट्या कागदपत्रांच्या आधारे चार घरे लाटण्याच्या प्रकरणात २० फेब्रुवारी रोजी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. या निर्णयाला नाशिक सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती. सत्र न्यायालयाच्या निर्णयात उच्च न्यायालयाने मंगळवारी हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तसेच, कोकाटे यांच्यासह अन्य प्रतिवाद्यांना नोटीस बजावून प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिल रोजी ठेवली. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कोकाटे यांच्यावरील अपात्रतेची कारवाई तूर्त टळली आहे.



दंडाधिकारी न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देताना नाशिक सत्र न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नोंदवले होते. न्यायालयाने नोंदवलेल्या या निरीक्षणावर आक्षेप घेऊन माजी मंत्री दिवंगत तुकाराम दिघोळे यांची कन्या आणि प्रकरणातील मूळ तक्रारदार अंजली राठोड यांनी नाशिक सत्र न्यायालयाने ५ मार्च रोजी दिलेल्या शिक्षेला स्थगिती देण्याच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या एकल खंडपीठासमोर ही याचिका मंगळवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, अंजली राठोड या प्रकरणात तक्रारदार नसल्याने ही याचिका करण्याचा त्यांना अधिकार नाही. तसेच, त्यांची याचिका ऐकण्यायोग्य नाही, असे कोकाटे यांच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. तर, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सत्र न्यायालयाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली. न्यायालयाने मात्र या टप्प्यावर सत्र न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले आणि राज्य सरकारसह कोकाटे बंधूंना नोटीस बजावून प्रकरण २१ एप्रिल रोजी ठेवले.

नाशिक जिल्ह्यातील दंडाधिकारी न्यायालयाने २० फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना दोषी ठरवून सरकारी कोट्याअंतर्गत घर मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याच्या प्रकरणात दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. या दोघांनीही या शिक्षेविरुद्ध सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते. सत्र न्यायालयाने ही शिक्षा स्थगित केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य असलेले कोकाटे हे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत.

# दंगलखोरांना त्यांचा पाकिस्तानातील अब्बा आठवेल अशी कारवाई होणार; फडणवीसांची भेट घेऊन नितेश राणेंचा इशारा

मुंबई, दि. १८ प्रतिनिधी

औरंगजेबच्या कबरीविरोधात सुरु झालेल्या आंदोलनांमुळे नागपुरात एक अफवा पसरली आणि त्याचे रुपांतर दंगलीत झाले. दंगलखोरांनी पोलिसांवरही हल्ले केले. अनेक गाड्यांच्या काचा फोडण्यात आल्या. तलवारी, लाठ्या काठ्या आणि दगडफेक करत दहशत पसरविण्यात आली. हा प्रकार मुख्यमंत्री, गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरात घडल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. यामुळे सगळीकडे हाय अलर्ट देण्यात आला असून विरोधक कडव्या हिंदुत्वावर वक्तव्ये करणाऱ्या नितेश राणेंवर टीका करत आहेत. अशातच नितेश राणेंनी फडणवीसांची भेट घेतल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.



नितेश राणे यांनी मुख्यंत्र्यांच्या दालनात जात त्यांची भेट घेतली. काही वेळानंतर ते बाहेर आले. नितेश राणेंनी केलेली एका समाजाविरोधातील भडक वक्तव्यांना विरोधक जबाबदार धरत आहेत. या मंत्र्याने राज्यातील वातावरण बिघडविले असल्याचा आरोप काँग्रेस, ठाकरे गटाचे नेते करत आहेत. यामुळे फडणवीसांनी राणेंना समज दिली असल्याची चर्चा सुरु आहे. अशातच प्रसारमाध्यमांनी नितेश राणेंना विचारले असता त्यांनी रागात प्रतिक्रिया दिली आहे.

मी मुख्यमंत्र्यांचा लाडका मंत्री आहे. या दंगलखोरांना त्यांचा 'पाकिस्तानातील अब्बा' आठवेल अशी कारवाई केली जाणार आहे. असा प्रकार घडल्यानंतर आमचं देवाभाऊंचं सरकार गप्प बसेल, असे तुम्हाला वाटते का? असा सवाल राणे यांनी केला. तसेच मी मुख्यमंत्र्यांना स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी गेलो होतो. फडणविसांनी हस्तांदोलन करत हसत माझे स्वागत केले. मुख्यमंत्री माझ्यावर काय बोलतात, याची चिंता तुम्ही करु नका. मी तुमच्या घरात डोकावतो का? असा सवाल त्यांनी पत्रकारांना केला. तसेच नागपूर हिंसाचारातील दोषींवर कठोर कारवाई होणार आहे. नागपुरात काही गोष्टी ठरवून करण्यात आल्या आहेत. या राज्यात पूर्वीसारखे काही घडवणे सोपे राहिलेले नाही. आंदोलकांना शांत करण्यासाठी पोलीस गेले होते, त्यांच्यावरच हल्ले करण्यात आले. हे कुठल्या चौकटीत बसणारे आंदोलन आहे, असा सवाल राणे यांनी उपस्थित केला. एका पोलीस अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला केला, ही हिंमत तोडण्याचे काम केले जाणार आहे, असा इशारा राणे यांनी दिला.

## महत्त्वाचे

### चैत्रोत्सव यात्राबाबत सप्तश्रृंगी गडावर आज आढावा बैठक

**नाशिक ।** श्री सप्तशृंगी निवासिनी देवी चैत्रोत्सव यात्रा दि. ५ ते दि. १२ या कालावधीत संपन्न होणार आहे. भगवतीची यात्रा सुरळीत पार पडावी म्हणून विविध विषयावर चर्चा करण्यासाठी तयारी करणे तसेच चैत्रोत्सव २०२५ चे नियोजन करणे, कायदा व सुव्यवस्था बाबत आढावा घेणेकामी आज (दि. १९) सकाळी ११ वाजता सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्ट कार्यालय येथे अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीस प्रत्येक विभागातील अधिकारी माहितीस्तव स्वतः उपस्थित रहावे. कृपया प्रतिनिधी पाठवू नये. असे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी केले. सप्तशृंगी गडावर रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे; परंतु यात्रोत्सव पंधरा दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. यात्रेअगोदर रस्ता होईल की नाही ही शंका आम्हा गावक-यांना पडलेली आहे. त्यातच धोंड्या कोंड्या विहरीजवळी नाल्याचे काम चालू आहे. त्या नाल्यात कमी रुंदीचे पाईप टाकण्यात आले असल्याने पावसाळ्यात ते पाईप चोकप होऊन पाणी रस्त्यावर येण्याचा संभव आहे. म्हणून त्या ठिकाणी जास्त रुंदीचे पाईप टाकण्यात यावे अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष, सप्तशृंगगड विवेक बेनके यांनी दिला आहे.

### 'झापुक झुपूक'च्या प्रमोशनला सुरुवात!

**नाशिक ।** बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण आता मराठी सिनेसृष्टी गाजवण्यासाठी सज्ज झाला आहे. सूरज चव्हाण लवकरच मोठ्या पडद्यावरुन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या



ज्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत, त्या चित्रपटाच्या प्रमोशनला मुहूर्त लागलाय. मोरगावच्या गणपती बाप्पाचा आणि जेजुरीच्या खंडोबा देवाचा आशीर्वाद घेत सुरज चव्हाणने 'झापून झुपक' सिनेमाच्या प्रमोशनची सुरुवात केली. खंडोबा देवाच्या चरणी सूरजने आपल्या आगामी चित्रपटाचे पोस्टर ठेवून, बाप्पाचा आशीर्वाद घेतला. इतकच नव्हे तर जिओ स्टुडिओज प्रस्तूत आणि केदार शिंदे दिग्दर्शित या चित्रपटाची एक छोटीशी झलकही त्याने आपल्या सोशल मीडियावर पोस्ट करुन प्रेक्षकांच्या उत्सुकतेत भर घातली आहे. सूरज चव्हाणसोबत या चित्रपटात अनेक मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. हालाकीच्या परिस्थितीतून वर येत सुरजने स्वतःच वेगळं असं छान विश्व तयार केलं. त्यामुळे सुरजचे चाहते त्याच्या ह्या नवीन प्रवासासाठी उत्सुक आहेत. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती बेला शिंदे, केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' चित्रपट कौटुंबिक आणि मनोरंजनने भरपूर अशी एक धमाल लव्हस्टोरी आहे. सिनेमाची कथा नक्की काय आणि कशी असणार आहे याचा उलगडा २५ एप्रिलला होईल.

### समर्थ नगर, मगर मळा परिसरात होळी साजरी

**एकलहरे ।** एकलहरा रोड येथील श्री स्वामी समर्थ नगर मगर मळा परिसरात पारंपरिक वेशभूषा



करून होळीचे विधिवत पूजन केले. त्यानंतर गोवऱ्यांनी रचलेली होळी पेटविण्यात येऊन हुताशनी पौर्णिमा अर्थात होलिकोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सायंकाळी ठिकठिकाणी महिला-युवतींनी होळीचे विधिवत पूजन केले. होळीभोवती सडा रांगोळी करून आकर्षक सजावट केली होती. रंगीबेरंगी हार चढवून तसेच फुगे लावून व हळद, कुंकू वाहून ठरलेल्या मुहूर्तावर होळीचे विधिवत पूजन करत होळी पेटवून पुरणपोळी नैवेद्य दाखविला. विविध ठिकाणी होणाऱ्या होळीला पुरणपोळी नैवेद्य दाखविण्यासाठी महिलांची लगबग दिसून येत होती. अरिंगळे मळा, मगर मळा, बालाजी नगर, स्वराज्य चौक यांच्या वतीने मानाची होळी रचण्यात आली होती. त्यासाठी एक हजार शंभर गोवऱ्या वापरण्यात आल्या. स्वराज चौक, अरिंगळे मळा, मगर मळा, बालाजी नगर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात होळी पेटविण्यात आल्या, होळीसाठी गोवऱ्या आणणे, होळीच्या जागेची स्वच्छता करून आपली होळी सर्वांत मोठी असावी यासाठी विविध मंडळांचे कार्यकर्ते प्रयत्न करीत होते. सड़ा टाकून गोवऱ्यांची विशिष्ट पद्धतीने रचना करून होळीला आकर्षक सजविण्यात आलेले होते. होळीसाठी लाकूड आणि इतर वस्तूंपेक्षा यंदा गोवऱ्यांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येत असल्याचे पाहण्यास मिळाले.

# मुक्त विद्यापीठात मानसशास्त्रीय चाचणी विकसन कार्यशाळा

**नाशिक ।** मनुष्य मुळात त्याच्या उत्पत्तीपासून इतर प्राण्यांसारखाच होता; परंतु त्यास विवेकवादी बनवण्याचे काम मनाच्या संस्कारांनी केलेले आहे. मनाच्या संस्कारांचा व व्यक्तीच्या वर्तनाचा परीघ हा अथांग आहे आणि शिक्षणशास्त्र हे व्यक्तीच्या वर्तनावर, संस्कारांवर आधारित आहे. त्यामुळे मानसशास्त्राचा अभ्यास करणे व त्याअनुषंगाने मानसशास्त्रीय चाचण्या विकसन करणे हे महत्वाचे व क्रमप्राप्त आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी केले.




विद्यापीठात शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानसशास्त्रीय चाचणी विकसन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले, सुप्रसिद्ध मानसशास्त्र अभ्यासक प्रा. दत्तात्रय तापकीर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक श्री. नागार्जुन वाडेकर, डॉ. राजश्री कापुरे उपस्थित होते. आपल्या उद्घाटनपर व्याख्यानात बोलताना सोनवणे पुढे म्हणाले की वस्तुस्थिती हा संशोधनाचा प्रमुख आधार आहे. मन समजून घेण्याचे थेट शास्त्रीय साधन नाही त्यामुळे वर्तनावरून ते जाणण्याचा प्रयत्न होत आला आहे. मानसशास्त्रीय चाचण्या हा त्यासाठीचा शास्त्रीय आधार आहे. या विषयात व क्षेत्रात शास्त्रीय संशोधन कामाला मोठा वाव असल्याचे कुलगुरू व्याख्यानाच्या शेवटी म्हणाले.

त्यानंतर कार्यशाळेत मानसिक क्षमता शोध चाचण्यांची विविध क्षेत्र निश्चिती (प्रा. दत्तात्रय तापकीर), मानसशास्त्रीय चाचण्यांचे प्रकार (डॉ. राजश्री कापुरे) व मानसशास्त्रीय चाचण्यांची निश्चिती व प्रश्न निर्मिती प्रक्रिया (डॉ. प्रणीता जगताप) याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेत राज्यभरातील मानसशास्त्राचे एकूण ६३ संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व तज्ञ व्यक्ति सहभागी झालेले आहेत. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. साधना तांदळे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. सुत्रसंचलन प्रमोद वाघ यांनी केले तर मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक नागार्जुन वाडेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

## मनपा शाळा क्र.५० येथे संभाजी राजांना अभिवादन

**एकलहरे ।** मनपा शाळा क्र. गोरेवाडी ५० येथे छत्रपती संभाजी राजे यांच्या बलिदान दिनानिमित्त शिवव्याख्याते शिक्षक राहुल कोळी यांनी शाळेला छत्रपती संभाजी राजे यांची प्रतिमा भेट दिली.

त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना बुऱ्हानपूरवर हल्ला, औरंगाबादवर हल्ला, रामशेज किल्ला, औरंगजेबच्या ताब्यातील किल्ले, शहजादा अकबर, रामदारीचा घाट, छत्रपती शंभूराजांना येत असलेल्या १६ भाषा, महाराष्ट्राच्या बाहेर असणारा त्यांचा दरारा तसेच फितुरीच्या मार्गाने त्यांना पकडून त्यांचे हाल औरंगजेबने कसे केले तरी ते घाबरले नाही, औरंगजेब आपल्या पत्रामध्ये काय म्हणतो या सर्व मुद्द्यांची सखोल माहिती राहुल कोळी यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

कोळी हे दरवर्षी विविध शाळांना छत्रपती संभाजी राजे यांची प्रतिमा भेट देत असतात. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक रत्नाकर झडप, शिक्षिका सरला जगळे तसेच तुकाराम कदम व राकेश घाडगे, दर्शन मुठाळ व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## हिंदू तिथीनुसार शिवजयंती उत्सव साजरा

### हिंदू एकतातर्फे शिवपुतळ्यांना अभिवादन व महाआरती





**नाशिक ।** हिंदू एकता आंदोलन पक्ष प्रणित शहीद भगतसिंग क्रांतीदल मंडळ ट्रस्टतर्फे हिंदू तिथीप्रमाणे मोठ्या उत्साहात शिवजयंती उत्सव साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातील नाशिकरोड, सीबीएस, पंचवटीसह सर्व शिवरायांच्या पुतळ्यांना सकाळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर द्वारका येथे भव्य देखावा साकारण्यात आला आणि छत्रपती शिवरायांना सामूहिक मुजरा करून महाआरती करण्यात आली. या सोहळ्याला शहरातील विविध भागांतून नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे उपस्थिती लावली. कार्यक्रमास मनसेचे सरचिटणीस दिनकर पाटील, गणेशोत्सव महामंडळ अध्यक्ष समीर शेटे, माजी नगरसेवक शाहू खैरे, हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, युवासेना अध्यक्ष दिगंबर नाडे, संतोष नरुटे (मुंबई नाका स्टेशन), मोहित साहेब (भद्रकाली पोलीस स्टेशन), संदीप डहाके (शिवसेना), प्रमोद सोनवणे (राष्ट्रवादी उद्योग विभाग), राजेंद्र कानाडे, बाळासाहेब शिंदे, सुरेश पवार, सुनील परदेशी, सोमनाथ भांड, राजेंद्र नेरकर, नितीन खैरनार, मनोज मराठे, कैलास ताते, महेश जगदाळे, बाळासाहेब पाठक, किशोर बेलसरे, रमेश मानकर, शाम पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी एमपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या प्रियांका कैलास ताते हिचा मंचावर जाहीर सत्कार करून तिच्या यशाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष किरणसिंग पवार, प्रसाद बावरी, विजय पवार, अनिल जाधव, उमेश पाटील, अतुल रणशिंगे, प्रताप पवार, नितीन काठवते, स्वप्नील काठवते, बाळासाहेब मोरे, महादू बेंडकुळे, कृष्ण औटी, मोहन पवार, भारत सदभैय्या, मोहन खाडे, अक्षय सूर्यवंशी, शिवा पवार, देवा पवार, जीव पवार, श्रावण खर्डे, माधव आचारी, रवी पवार, प्रतीक कसबे, अशोक गांगुर्डे, त्रिदेव सदभैय्या, मंगला पवार, प्रियांका अहिरराव, प्रिया ताते यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी केला. या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शिवरायांच्या कार्याचा सन्मान केला.

## कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या मागण्यांसंदर्भात लवकरच सकारात्मक निर्णय

### शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे शिक्षक महासंघाच्या शिष्टमंडळाला आश्वासन

**नाशिक ।** राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी सोमवारी (दि.१७) संपूर्ण राज्यात तहसीलदार, जिल्हाधिकारी, आयुक्त, शिक्षण विभाग या सर्वांना निवेदन देत आपल्या प्रश्नांकडे शिक्षणमंत्र्यांचे व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी एल्गार पुकारला.

सरकार सत्तेवर येऊन दोन महिने उलटले; परंतु कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या आश्वासित प्रलंबित मागण्या संदर्भात शासनाने कुठलीही चर्चा अथवा बैठक घेतलेली नाही. अद्यापपर्यंत प्रश्न प्रलंबित असल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर पसरलेला आहे. विधान मंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनाच्या



**मुंबई । शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देतांना आमदार सत्यजित तांबे. समवेत महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर, सचिव प्रा. लक्ष्मण रोडे, उपाध्यक्ष प्रा. रवींद्र भदाणे, सदस्य प्रा. नामदेव शेजवळ, प्रा. तनपुरे आदी पदाधिकारी.**

पार्श्वभूमीवर सरकारचे व शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी सर्व दूर राज्यात शांततेच्या मार्गाने कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांनी आपापल्या तालुक्यात तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना तसेच शिक्षण विभागाला निवेदन देत सरकारचे लक्ष वेधले. त्याचाच एक भाग म्हणून राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाच्या वतीने मुंबई येथे विधान भवनात शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना महासंघाच्या मागण्यांचे निवेदन दिले. याप्रसंगी बोलताना शिक्षणमंत्र्यांनी अधिवेशन संपल्यानंतर आठ ते दहा दिवसांत प्रलंबित मागण्यांसंदर्भात बैठक घेऊन महत्त्वाच्या मागण्या तात्काळ मार्गी लावण्याबाबत आम्ही सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रलंबित विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. आमदार सत्यजित तांबे यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्यासह महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर, सचिव प्रा. लक्ष्मण रोडे, उपाध्यक्ष प्रा. रवींद्र भदाणे, सदस्य प्रा. नामदेव शेजवळ, प्रा. तनपुरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## महासंघाच्यावतीने तहसीलदारांना निवेदन



**नाशिक ।** प्रलंबित मागण्यांसंदर्भात नायब तहसीलदार सुनीता पाटील यांनादेखील महासंघाच्या वतीने प्रा. किरण रेडगावकर, प्रा. उत्तम पवार, प्रा. प्रवीण ठोंबरे, प्रा. भाऊसाहेब मोरे, प्रा. दादा कदम यांनी निवेदन दिले. यावेळी प्रा. राजू मोगल, प्रा. रणजित पवार, प्रा विठ्ठल जाधव, अर्जुन मिटके, विजय गढरी, शामकुमार कापडणीस, भगवान पागिरे, रावसाहेब शिंदे, सुनिल बोरगुडे, प्रज्ञा वाघ, मंदा गिते, पुष्पा पाटील, संगीता ठाकरे, सोनाली पाटील, संगीता भंडारे, बी. एस. वडजे आदी उपस्थित होते.

## अंकुश मोरे यांचा बहुप्रतिक्षीत चित्रपट 'नयन' होणार प्रदर्शित

**नाशिक ।** मनाला भिडणारे अनोखे विषय नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी मराठी सिनेसृष्टी जागतिक पातळीवर ओळखली जाते. अशाच पद्धतीचा तसेच 'आजचा संघर्ष, उद्याचे सामर्थ्य' अशी प्रेरणादायी टॅगलाईन असलेला 'नयन' येत्या शुक्रवारी म्हणजेच २१ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात एक महत्त्वपूर्ण विषय अतिशय सहजपणे सादर करण्यात आला आहे.

गोपी एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निर्मात्या अरुणा मोरे यांनी 'नयन' या बहुचर्चित चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'नयन'ची कथा-संवादलेखन अंकुश मोरे यांनी केले असून, त्यांनीच या चित्रपटाचे कल्पक दिग्दर्शनही केले आहे. या चित्रपटाची कथा कोकणात घडणारी आहे. नृत्याची आवड असलेल्या नयनची रोमांचक तसेच हृदयस्पर्शी गोष्ट या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ही गोष्ट जरी एका नयनची असली तरी ती जगभरातील असंख्य तरुणांचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने समाजातील एक जळजळीत वास्तव रुपेरी पडद्यावर सादर करण्याचे धाडस अंकुश मोरे यांनी केले आहे. अंकुश मोरे यांना कलाकारांची अचूक साथ लाभल्याने 'नयन'च्या रूपात एक सर्वांगसुंदर कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या चित्रपटाबाबत अंकुश मोरे म्हणाले की, या चित्रपटाची कथा वेगवेगळे पैलू उलगडणारी




आहे. समाजातील विविध मुद्द्यांवर भाष्य करत अनेक प्रश्न उपस्थित करणारी असून, त्यावर अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी आहे. आजवर क्वचितच चर्चिल्या गेलेल्या विषयाला 'नयन' वाचा फोडणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने नयनसारख्या असंख्य तरुणांची व्यथा आणि कथा समाजासमोर येणार आहे. यामुळे कदाचित भविष्यातील नयनरूपी तरुणांचे आयुष्य सुखकर होण्याची शक्यता आहे. आशयघन कथानक, मुद्देसूद पटकथा, अर्थपूर्ण संवाद, आपलीशी वाटणारी बोलीभाषा, सहजसुंदर अभिनय, उत्कंठावर्धक दिग्दर्शन, पटकथेशी एकरूप होणारी गाणी, कर्णमधूर संगीत, सुरेख सादरीकरण आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये याद्वारे 'नयन'च्या रूपात एक परिपूर्ण कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आल्याचेही मोरे म्हणाले.

'नयन'ची पटकथा नारायण गोंडाळ यांनी लिहिली असून, संकलन सुबोध नारकर यांनी केले आहे. सिद्धेश पै, मोनालिसा बागल, सुहास पळशीकर, अंशुमाला पाटील, रिना लिमन, गणेश यादव, दीपक शिर्के, विजय पाटकर, प्रणव रावराणे, श्रीनिधी शेट्टी आदी कलाकारांच्या या चित्रपटात भूमिका आहेत. सुरेश वाडकर, जावेद अली, आदर्श शिंदे, स्वप्नील बांदोडकर, आनंदी जोशी, राहुल सक्सेना या मराठीतील आघाडीच्या गायकांनी 'नयन'मधील गाणी गायली आहेत. संगीत विक्रांत वार्डे यांचे आहे, तर पार्श्वसंगीत पंकज पडघम यांनी दिले आहे. नृत्यदिग्दर्शन सिद्धार्थ पै यांचे असून, ध्वनी संयोजन सुनील पाटोळे यांनी केले आहे. छायालेखन डिओपी राजा फडतरे यांचे असून, महेश भारंबे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. रंगभूषा दादाभाई सेना समुद्रे, संतोष चारी यांनी, तर वेशभूषा महेश यांनी केली आहे.

## महत्त्वाचे

### महापालिकेत महिलांचा ठिय्या

**नाशिक ।** दोन महिन्यापासून चुंचाळे शिवारात पाणीटंचाई निर्माण झाल्याने या विरोधात महापालिका मुख्यालय राजीव गांधी भवन येथे



आयुक्तांच्या दालनासमोर महिलांनी ठिय्या आंदोलन केले. पंधरा दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी महिलांनी दिला. महिलांसमवेत माजी नगरसेवक भागवत आरोटे, मधुकर जाधव, हर्षदा गायकर हे होते. यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. चुंचाळे शिवरातील संजीवनगर, रामकृष्ण नगर, बालाजी पार्क, पाटील पार्क, जाधव संकुल, विरार संकुल, तसेच खुटवडनगरच्या काही भागात मागील दोन महिन्यापासून अपुरा पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे महिलांना पाण्याची चणचण सहन करावी लागत आहे. त्यामुळे महिलांनी आयुक्तांच्या दालनाबाहेर ठिय्या दिला.

### मनपाचा कर विभाग ॲक्शन मोडवर

**नाशिक ।** नाशिक महापालिकेचा कर विभाग ॲक्शन मोडवर आला असून, थकबाकीदारांच्या मिळकती जप्त करण्याची मोहीम राबविण्याचा गांभीर्याने विचार केला जात आहे. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी महापालिकेच्यावतीने थकबाकी वसुलीसाठी जोरदार प्रयत्न सुरू असून, यापूर्वी जप्ती वॉरंट बजाविण्यात आलेले आहे. वॉरंट बजावूनही घरपट्टी न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांच्या मिळकती जप्त करण्याबरोबरच लिलाव करण्याच्या सूचना महापालिकेने दिल्या आहेत. शहरातील १२० मोठ्या थकबाकीदार मिळकती जप्ती मिळकतींवर जप्तीची टांगती तलवार आहे. चालू आर्थिक वर्षात २४५ कोटींचे घरपट्टी वसुलीसाठीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी २३९.८१ कोटी रुपये वसुली झाली आहे. नियमित करा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात थकबाकी असलेल्या सहा विभागातील ४२६ थकबाकीदारांना जप्ती वॉरंट बजावले होते. थकबाकीदारांकडे बारा कोटी ७४ लाख रुपये इतकी थकबाकी आहे. पाणीपट्टीचे ७५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट आहे.

### बीपीएमएस सर्व्हर डाऊनचा फटका

**नाशिक ।** एकीकृत विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकामाची परवानगी घेताना ऑनलाईन परवानगी बंधनकारक करण्यात आले आहे; परंतु महसूल उद्दिष्ट तसेच रेडीरेकनरच्या दरातील प्रस्तावित वाढ लक्षात घेऊन महापालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री यांनी ३१ मार्च अखेरपर्यंत ऑफलाइन बांधकामाच्या परवानगीला मंजुरी दिली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे तांत्रिक कारणास्तव कारणामुळे प्रलंबित प्रस्तावांचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई वगळता राज्यभरात एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली डिसेंबर २०२० पासून लागू करण्यात आली आहे. नियमावली नियमावलीनुसार बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टमद्वारे बांधकाम परवानगीचे प्रस्ताव बंधनकारक करण्यात आले आहे. डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत आयुक्तांच्या परवानगीने ऑफलाइन बांधकामाला म्हणून परवानगी बांधकाम परवानगीला मंजुरी होती; परंतु त्या दरम्यान चुकीच्या पद्धतीने परवानगी देण्याबरोबरच नगररचना विभागाशी संबंधित अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने आयुक्तपदाचा कारभार स्वीकारल्यानंतर मनीषा खत्री यांनी सुधारणा करत तातडीने ऑनलाईन परवानगी बंधनकारक केली होती.

### वसुलीसाठी जिल्हा बँक ॲक्शन मोडवर

**निफाड ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व सहकार खात्याने थकबाकी कर्ज वसुलीसाठी ॲक्शन प्लॅन तयार केला असून, त्याचाच एक भाग



म्हणून दिनांक १७ रोजी निफाड येथे जिल्हा उपनिबंधक फयाज मुलानी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन वसुलीचा आढावा घेतला आहे. बँकेचे ॲक्शन प्लॅननुसार जिल्हा बँक ॲक्शन मोडवर आली असून, सर्व वसुली अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व सहकार खात्याची संयुक्त बैठक निफाड येथील सरकार भवन येथे झाली. बैठकीला जिल्हा उपनिबंधक फैयाज मुलांनी, सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे, ज्ञानेश्वर वाटपाडे, मुख्याधिकारी आनंद गुरु, पालक अधिकारी प्रदीप आव्हाड, बाळासाहेब बेंडकुळे, विभागीय अधिकारी संजय मानकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

## आला दिस रंगपंचमीचा... विविधांगी रंगात रंगुनी जायचा...




पारंपरिक वारसा लाभलेल्या नाशिक नगरीतील तांबट लेन, मधली होळी, शनि चौक, शिवाजी चौक, कथडा, दंडे हनुमान आदींसह विविध ठिकाणच्या रहाडी रंगपंचमीसाठी सज्ज झाल्या आहेत. तसेच रंगपंचमीच्या पूर्व दिनी रंग खेळण्यासाठी विविध रंग, पिचकाऱ्या खरेदी करण्यासाठी बाजारात रंगप्रेमींची गर्दी उसळली होती.

(छायाचित्रे : सोज्ज्वळ साळी)













## भूमिपुत्र चालक-मालक वाहतूक संघटनेचा बेमुदत संप



**दिंडोरी ।** तालुक्यातील परमोरी येथे युनायटेड स्पिरिट लिमिटेड या कंपनीसाठी अनेक वर्षे काम करणाऱ्या भूमिपुत्र चालक-मालक वाहतूक संघटनेच्या चालक-मालकांना कंपनीने बदल करून नवीन ठेकेदार बालूरघाट टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांना वाहतुकीचा ठेका दिला.

मात्र, या नव्या ठेकेदाराने ठरवलेले दर न पाळता कमी पैसे देण्यास सुरुवात केली आहे. त्याच प्रमाणे गाड्यांना ठरलेले भाडे दिले जात नाही.उर्वरित रक्कम वेळेवर न मिळता कमी दिली जाते. संघटनेच्या गाड्यांना काम न देता बाहेरच्या गाड्यांना वाहतुकीसाठी वापरले जाते. युनायटेड स्पिरिट लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी मनमानी केली असून, ब्लॅकलिस्ट असलेल्या बालूरघाट कंपनीला ठेका दिला आहे. बालूरघाट टेक्नॉलॉजीचे लोकं संघटनेच्या सदस्यांना वारंवार धमकावत आहेत.

या अन्यायाविरोधात भूमिपुत्र चालक-मालक वाहतूक संघटनेने युनायटेड स्पिरिट लिमिटेडच्या प्रवेशद्वारावर बेमुदत संप सुरू केला आहे. या संपामुळे अनेक कुटुंबे उपासमारीच्या उंबरठ्यावर आली आहेत.

संघटनेने वारंवार अधिकाऱ्यांशी चर्चा केली, पण तोडगा निघाला नाही. त्यामुळे जर मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर संघटनेने आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या प्रसंगी निकितेश ठाकरे, विलास गायकवाड, राजू गुंजाळ, फिरोज शेख, योगेश डुंबरे, शरद निमसे, भाऊसाहेब धात्रक, सागर कसबे आणि इतर अनेक चालक-मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपावर लवकर तोडगा निघणार का? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## मुंबई नाका पोलिसांची मोठी कारवाई



**नाशिक ।** मुंबईनाका पोलिसांनी एक उल्लेखनीय कामगिरी करत शहरातील विविध भागांत चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला अटक केली आहे. आरोपी नितीन शरद काळे याने नाशिकमधील वेगवेगळ्या ठिकाणी मोबाईल आणि वाहनचोरीचे ७ गुन्हे केल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी या आरोपीकडून ३.७४ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास मुंबई नाका पोलीस स्टेशनच्या वतीने सुरू आहे.

मुंबईनाका पोलीस ठाण्यात एका रिक्षाचालकाचा मोबाईल चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती गुन्ह्याच्या तपासादरम्यान, पोलीस अंमलदार समीर शेख आणि राजेंद्र नाकोडे यांना माहिती मिळाली की, एक इसम विना नंबरच्या काळ्या रंगाच्या ॲक्टीवा गाडीवर मोबाईल विकण्यासाठी रविशंकर मार्गावर येथे येणार आहे. त्यानंतर, सहायक पोलीस निरीक्षक सतीश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचला व आरोपी नितीन काळे याला रंगेहात पकडलं. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल सापडल्यावर अधिक चौकशी केली असता, त्याने अजून १६ मोबाईल आणि ४ वाहने चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपी नितीन काळे हा भाड्याने रिक्षा घेऊन, लोकेशनसाठी फोन करण्याच्या बहाण्याने चालकाचा मोबाईल घेत असे आणि त्यानंतर पळ काढत असे. याशिवाय, पार्किंगमध्ये उभी असलेली चावी लावलेली वाहने चोरून तो ती विकत असे. या कारवाईत एकूण १६ मोबाईल आणि ४ वाहने असा एकूण ३.७४ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी नितीन काळे याला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या चोरीविषयक कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर एल्गारचे आंदोलन मागे

### चार दिवसांत मातृत्व अनुदान खात्यावर



**त्र्यंबकेश्वर ।** मातृत्व अनुदान व मानव विकास योजनेच्या अनुदानासाठी एल्गार कष्टकरी संघटनेच्या महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी त्र्यंबकेश्वर पंचायत समितीतील तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात दि.१७ मार्च रोजी धरणे आंदोलन केले.

टाकेदेवगाव उपकेंद्रा अंतर्गत कार्यक्षेत्रातील महिला लाभार्थ्यांना मातृत्व अनुदान आर्थिक लाभ न मिळाल्याने धरणे आंदोलन सुरू केले होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनात सुरेखा मधे, वसंत इरते, हनुमंत सराई, तुषार देहाडे, समाधान सदगीर, सोमनाथ बांगारे, भावडू निरगुडे, योगिता लोणे, अर्चना. येले, हिरामण गिरे, सोमनाथ आव्हाटे व महिला उपस्थित होत्या.

## 'वासुदेव'या गाण्याची विद्यार्थ्यांना भुरळ!

**एकलहरे ।** पूर्वी ग्रामीण भागामध्ये वासुदेव सकाळी यायचा व आपल्या आवडते देवाचे गाणे म्हणायचा. यामुळे लोक वासुदेव आला की त्याला पीठ द्यायचे. असा वासुदेव चा नित्यक्रम असायचा. वासुदेवच्या गाण्यांमध्ये खूप



चांगला अर्थ लपलेला राहायचा. तो त्याच्या चालीमध्ये म्हणायचा.

हाच वासुदेव आजच्या विज्ञान युगात हरवून गेलेला आहे. पूर्वी जसे ग्रामीण भागामध्ये दिसायचे आता तसे ते दिसत नाही; पण या वासुदेवची आठवण आज सुद्धा विद्यार्थ्यांना येते. त्याचे कारण म्हणजे मनपा शाळा क्रमांक 50, गोरेवाडी तसेच सिन्नर फाटा येथील उपक्रमशील शिक्षक राहुल कोळी यांनी वासुदेवच्या चालीत स्वतः शैक्षणिक गाणं लिहिलं आणि स्वतःच म्हटले. ते गाणे असे "वासुदेव आला रे, वासुदेव आला, चला चला शाळेत वासुदेव आला, पाटी, पेन्सिल घेऊन शाळेत चला, वाचन लेखन करून सारे शिकूया " हे गाणे



विद्यार्थी शाळेत येताना व शाळा सुटल्यावर घरी जाताना म्हणत जातात. या गाण्यांमध्ये प्रत्येक विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचा अर्थ सुद्धा समजण्यात खूप सोपा आहे. जेव्हा शिक्षक कोळी हे गाणं म्हणत असतांना तेव्हा त्यांचे तीन विद्यार्थिनी जानव्ही जोपूळकर, मानसी गायकवाड व ज्ञानेश्वरी वेळकर हे वासुदेवच्या रूपात गाण्याच्या बोलवर हावभाव करून व नृत्य करतात. या गाण्यातून एक संदेश नक्की मिळतो की, शिक्षण घेणे किती महत्त्वाचे आहे. पालकांमध्ये शैक्षणिक जनजागृती होणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी कोणतेही मुले शाळाबाह्य न राहता त्यांना शाळेची गोडी निर्माण होणे खूप महत्त्वाचे आहे. असे विविध संदेश या गाण्याच्या माध्यमातून मिळत आहे. हे शैक्षणिक गाणे प्रथम सिन्नर फाटा वस्तीमध्ये दाखवण्यात आले. व गोरेवाडी परिसरात दाखवण्यात आले.या गाण्याची गोडी एवढी वाढली आहे की, नाशिक रोडमधील मनपाच्या अनेक शाळेतील मोठ्या स्क्रीनवर हे गाणे दाखवले जात आहे.

विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवणे, शाळेची आवड निर्माण होणे, अभ्यास करणे यासाठी सर्व शिक्षक प्रयत्नशील असतात. हे गाणे चौथ्या टप्प्यातील 'शिक्षक क्षमता वृद्धी सक्षमीकरण' मध्ये अनेक शिक्षकांना प्रत्यक्ष दाखविण्यात आले. यासाठी सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले. यासाठी प्रशिक्षणाचे ट्रेनर सोनवणे सर व कड सर (स्वामी विवेकानंद विद्यालय, सिडको ) यांनी परिश्रम घेतले. शिक्षक राहूल कोळी यांनी अनेक गाणे शिक्षणावर लिहिलेले आहे.

## "माकोज" दूध व दूध उपपदार्थ विक्री दरात वाढ

**दूध उत्पादकांना सर्वाधिक दर देणे करीता "माकोज" दूध व दूध उपपदार्थ विक्री दरात वाढ चेअरमन मा. श्री. माणिकराव कोकाटे**

सिन्नर तालुका विभागीय सहकारी दुध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या, सिन्नर या नाशिक जिल्ह्यातील एकमेव सहकारी दुध संघाच्या अद्ययावत प्रकल्पाची उभारणी मौजे हरसुले येथे करण्यात आलेली आहे. संघामार्फत सिन्नर, पिंपळगाव, नाशिक व परीसरात माकोज दुधाच्या प्रमाणित दुध, गाय दुध, टोन्ड दुध व दुधाचे उपपदार्थ दही, लस्सी व ताक पॅकिंगद्वारे ग्राहकांना विक्री होत आहे. अल्पावधीतच पॅकिंगद्वारे दैनंदिन ५०००० लि. दुधाचे विक्रीचे उद्दिष्टे व दुध उपपदार्थ विक्रीत वाढ करण्याचा संघाचे चेअरमन श्री. माणिकराव कोकाटे यांचा मानस आहे. सदर प्रकल्पातून केंद्रशासनाच्या मिलीटरी फार्म देवळाली व ११ बी.आर.डी. ओझर येथे अविरत मागील ११ वर्षापासुन पॅकिंगद्वारे प्रमाणित "माकोज" दुधाचा पुरवठा होत आहे. दुध उत्पादकांना अधिकच्या सोयी सुविधा देणे करीता "माकोज" प्रमाणित दुध व गाय दुधाच्या पॅकिंग दुध विक्री दरामध्ये दि. १५/०३/२०२५ पासुन प्र.लि. रु.२.००/- प्रमाणे दरवाढ करण्याचे निश्चित केले असुन संघामार्फत आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा दुध उत्पादक व दुध पॅकिंग वितरकांना देण्याचे संबोधित केले. मागील महिन्यात राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आनंद, गुजरात येथे संघ संचालक व अधिकारी समवेत केलेल्या अभ्यास दौ-यात राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड मार्फत नवनविन तंत्रज्ञानाचा फायदा तालुक्यातील दुध उत्पादकांना मिळवुन देणार असल्याचे आश्वासित केले. यावेळी संघाचे व्हा. चेअरमन श्री. विठ्ठलराव नारायण पगार, सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# औरंगजेब जिवंत होतो तेंव्हा...

**सुमारे ४०० वर्षापूर्वी मरण पावलेल्या आणि खुलताबादेच्या मातीत गाडल्या गेलेल्या औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यात वाद उफाळला आहे. औरंगजेबाची कबर नष्ट करण्याची मागणी महायुती सरकारमधील एका XXडोक मंत्र्याने केली आणि पुन्हा वाद पेटला. या मागणीसाठी विहिंप, बजरंग दल आणि अशाच अनेक संघटनांनी सोमवारी राज्यात ठिकठिकाणी मोर्चे काढले, आंदोलने केलीत आणि त्याची परिणीती नागपूरच्या दंगलीत झाली. आता मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री एका विशिष्ट समाजावर खापर फोडत आहेत. औरंगजेबाच्या कबरीसारख्या क्षुल्लक मुद्यावर राजकारण करणाऱ्यांना नेमके साधायचे काय?**

-----------------






काही महिन्यांपूर्वी छावा चित्रपट आला आणि ४०० वर्षापूर्वी गाडल्या गेलेल्या औरंगजेबाचा जिवंत करण्यात आले. काही दिवसांपूर्वी समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाचे गोडवे गायले, त्याच्या कार्याची महती सांगितली, त्याचा पराक्रम विशद केला आणि इथूनच एका नव्या वादाला तोंड फुटले.

मराठवाड्याच्या खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीवर कोण जातात? तेथे कोण नतमस्तक होतात? याचेशी सर्वसामान्य मराठी माणसांना काय घेणे देणे? औरंगजेबाची कबर हटवा, अशी मागणी करणारे आग्र्याच्या ताजमहाल हटवा, या देशातील कुतूबमिनार, चारमिनार, लाल किला वगैरे वास्तू सुद्धा पाडून टाका, अशी मागणी करणार आहेत का?

जातीय तेढ निर्माण करणे, धार्मिक वाद उफाळून येईल, अशा कृती आणि वक्तव्य करण्याचा ठपका काही संघटनांवर याआधीही ठेवला गेला आणि आताही ठेवला जातो आहे. परंतु, गेल्या काही वर्षात कोकणातील एक लोकप्रतिनिधी सातत्याने अशी सामाजिक सौहार्द बिघडवणारी वक्तव्ये करतो आणि त्याच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते, मंत्री शांत बसतात, त्याला समज देत नाही. यावरून पाणी कुठे मुरते आहे? हे लक्षात यावे.

स्वराज्यावर वाकडी नजर टाकणारा, छत्रपती संभाजी राजांचा अनन्वीत छळ करून त्यांना ठार मारणारा औरंग्या कुठे आहे? तो शाळेच्या पाठ्यपुस्तकात नाही, आपल्या मराठीजनांच्या मनात नाही, भिंतीवर नाही किंवा चौकातील कुठल्याही बॅनरवर नाही. तो कधीचाच नष्ट झाला. त्याला जिवंत करतेय कोण?

औरंगजेबाची कबर नष्ट करण्याच्या मागणीला घेवून आंदोलन करण्याचा विषय काही एका दिवसात ठरला नसेल. त्यासाठी गुप्त खलबते झाली असतील, कोणी कुठे आणि कसे आंदोलन करायचे? याचे नियोजन झाले असेल. पण, ज्या विषयाशी सामान्यजणांना काही घेणेदेणे नाही त्या विषयाला घेवून आंदोलन करण्याची गरज ती काय? आणि या आंदोलनाला परवानगी दिलीच कशी जाते?

नागपुरात सोमवारी आंदोलन झाले, त्याची प्रतिक्रिया काही वेळातच उमटली. तूफान दगडफेक झाली, जाळपोळ केल्या गेली, अनेक गाड्या जाळल्या, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. लक्षावधीच्या मालमत्तेचे नुकसान झाले. असले बिनकामाचे मुद्दे या उपटसुंभांनी एकरून काढायचे, त्यातून वाद निर्माण करायचा आणि जखमा बिचाऱ्या आमच्या पोलीसवाल्यांनी सहन करायच्या.

खरेच राज्यात सगळेकाही ऑलबेल आहे का? शेतकरी आत्महत्या करीत नाही, बेरोजगार नोकरीसाठी भटकत नाहीत, गुन्हेगारीवर आळा बसला आहे, कुठेच बलात्कार आणि खून होत नाही, चोऱ्या, मारामाऱ्या तर बंदच झाल्यात, अशी स्थिती दिसते आहे का? मग, या सर्व समस्यांकडे कानाडोळा करून औरंग्याची कबर, हा फालतू विषय घ्यायचाच कशाला? विस्मृतीत गेलेल्या त्या औरंग्याला पुन्हा पुन्हा जिवंत करायचे कशाला?

राज्यात गेल्या काही महिन्यात अनेक मोठ्या घटना घडल्या. बिडचे प्रकरण तर अतिभयंकर आहे. वाल्मिक कराड आतमध्ये गेला. धनंजय मुंडे घरी बसवला गेला. याच बिडची एकना एक प्रकरणे समोर येत आहेत. कदाचित, या सर्व प्रकरणावरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी, आपले पाप झाकण्यासाठी तर औरंग्याच्या कबरीचा विषय उकरून काढला जात नसावा?

नागपूरच्या दंगलीवरून आता एकमेकावर आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत. विरोधकांनी टीकेचा भडीमार चालविला आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी तर ही दंगल आणि अशा घटनेसाठी एकप्रकारे राज्य सरकारच जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र सरकारमधील एक विषारी मंत्री दररोज खुलेआमपणे द्वेष पसरवण्याचा व दुही पिकवण्याचे काम करत असल्याचे ते म्हणतात आणि त्यात तथ्यही आहे. या मंत्र्यांनी तोंड बंद ठेवले तरी या राज्यातील स्थिती सामान्य होवू शकते. त्यामुळे विष ओकणे थांबवा.

••••

# शिवप्रभू आचरणातही दिसावेत!

तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात.

चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे.

शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर करताना आढळतात.

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही?

जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे.

आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच.

शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी.

आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

■ ■ ■

# मुंग्यांचे व्यक्तिमत्व, विद्यार्थ्यांना प्रेरणादायी

मुंग्या, जरी साधारण दिसत असल्या तरी, प्राणी जगातल्या अतिशय अद्भुत प्राण्यांपैकी एक आहे. त्या विद्यार्थ्यांसाठी अनेक अमूल्य धडे देतात, जसे की सांघिक कार्य, शिस्त, सातत्य, नेतृत्व आणि नवकल्पना. आकाराने लहान असल्या तरी मुंग्यांमध्ये अनेक असामान्य गुणधर्म आहेत, जे मानवाला त्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक जीवनात अधिक प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा देतात. यश आणि महानता हे सतत परिश्रम आणि सहकार्यातून मिळते, याची जाणीवच जणू मुंग्या आपल्याला करून देतात.

**शिस्त आणि संघटन**

मुंग्या सांघिक कार्याद्वारे उत्कृष्ट कामगिरी करतात, प्रत्येक सदस्य विशिष्ट भूमिका बजावतो आणि वैयक्तिक ओळख न देता योगदान देतात. हा सामूहिक प्रयत्न त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे किंबहुना प्रत्येकाची मिळणारी एकत्रित कार्यक्षमता त्यांच्या यशाचा मुख्य आधार बनते.

विद्यार्थ्यांसाठी, समूह प्रकल्प आणि भविष्यातील व्यावसायिक जीवनात सांघिक कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुंग्यांप्रमाणे, विद्यार्थी एकमेकांच्या भूमिका समजून आणि त्यांचा आदर करून अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात.

गट प्रकल्पांमध्ये, प्रत्येक सदस्याला त्याच्या विशेष कौशल्यांचा वापर करून योगदान देण्याची संधी मिळते, ज्यामुळे कायाची गुणवत्ता आणि कार्यक्षमतेत वाढ होते. सांघिक कार्य विद्यार्थ्यांना एकत्र काम करून सामूहिक उद्दिष्ट साध्य करण्याची संधी प्रदान करते, ज्यामुळे न फक्त मोठ्या प्रकल्पांची यशस्वी पूर्तता होते, तर लहान योगदान देखील मोठ्या यशात महत्त्वपूर्ण ठरते.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून, एकत्र काम केल्याने प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक, सर्जनशील आणि शारीरिक क्षमता वर्धित होतात आणि त्यामुळे त्यांचे एकत्रित कार्य अधिक परिणामकारक ठरते.

**आव्हानांवर मात करण्याची किमया**

मुंग्या सातत्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. जर एक मुंगी अडचणीला सामोरे जाते, तर ती हार मानत नाही. ती चुकत-चुकत, नवीन मार्ग शोधत आपल्या उद्दीष्टांपर्यंत पोहोचते. विद्यार्थ्यांसाठी, ही शिकवण खूप महत्त्वाची आहे. शैक्षणिक जीवनात अनेक वेळा अडचणी येतात, पण त्यांच्याशी झुंज देत, जिद्द आणि सातत्याने प्रयत्न करत यश मिळवता येते.

प्रभावी संवाद

फेरोमोन (रासायनिक संकेत) वापरून एकमेकांशी संवाद साधणाऱ्या मुंग्यांमध्ये अन्नाचे स्त्रोत, धोके किंवा पर्यावरणातील बदल याबद्दल माहिती सहजपणे प्रसारित केली जाते.

या संकेताचा वापर अत्यंत प्रभावी असतो, कारण त्यातून त्या एकमेकांच्या हालचालींचा समन्वय साधतात आणि त्यानुसार प्रभावी योजना तयार करतात. विद्यार्थ्यांसाठी, प्रभावी संवाद म्हणजे केवळ शब्दांद्वारेच नव्हे, तर नॉन-वर्बल संकेत, शारीरिक भाषा आणि ऐकण्याची क्षमता वापरून संवाद साधणे. मुंग्यांप्रमाणे, विद्यार्थी देखील स्पष्ट विचार मांडून, सहकार्य करून आणि इतरांचे विचार ऐकून अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकतात, ज्यामुळे ते अधिक यशस्वी होऊ होतात.

**नेतृत्व आणि जबाबदारी**

नेतृत्व फक्त सत्ता नसून, एक जबाबदारी आहे हे मुंग्यांकडून विज्ञानात्मक दृष्टिकोनातून स्पष्टपणे दिसून येते. राणी मुंगी वसाहतीच्या आरोग्याची काळजी घेत असली तरी, काम करणाऱ्या मुंग्या (वर्कर अँट्स) इतरांना मार्गदर्शन करतात आणि सामूहिक कार्यांसाठी निर्णय घेत पुढाकार घेतात.

काम करणाऱ्या मुंग्यांमध्ये अनेक विशिष्ट कार्ये असतात, जसे की अन्न गोळा करणे, वसाहतीचे संरक्षण करणे आणि वयस्कर मुंग्यांची देखभाल करणे. हे सर्व कार्य एकत्र येऊन वसाहतीच्या यशस्वीतेची आणि टिकावाची खात्री करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, या काम करणाऱ्या मुंग्यांचे नेतृत्व कौशल्य दिसून येते, कारण ते कोणत्याही नेतृत्वात्मक भूमिकेतील व्यक्तीप्रमाणे न केवळ कार्यांचे समन्वय साधतात, तर इतरांना प्रेरणा देऊन सामूहिक यशासाठी आवश्यक निर्णय घेतात.

विद्यार्थ्यांसाठी, हे खरे नेतृत्व आहे– कधीकधी प्राधिकृत भूमिका नसताना, इतरांची मदत करणे, गटाच्या उद्दीष्टांसाठी कार्य करणे आणि एकत्रितपणे यश प्राप्त करणे.



**डॉ. देवश्री आनंद नगरकर**
**सहाय्यक प्राध्यापक**
**प्राणीशास्त्र विभाग**
**एल. ए. डी. श्रीमती आर. पी. कॉलेज (महिलांसाठी) नागपूर.**
**9730045438**

**समस्यांचे समाधान आणि नवकल्पना**

मुंग्या समस्यांचे निराकरण सहजपणे करतात. जर त्यांना अडचण आली, तर नवीन मार्ग शोधतात. त्यांच्या सर्जनशीलतेचे आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य त्यांच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. काम करणाऱ्या मुंग्यांच्या प्रयत्नांमध्ये अडथळ्यांवर मात करणे आणि दुसऱ्या मुंग्यांना मार्गदर्शन करणे यांसारख्या कार्यांचा समावेश असतो.

या प्रक्रियेतील अचूक समन्वय आणि अभिनवतेमुळे वसाहतीचे कार्य सुरळीतपणे चालते. विद्यार्थ्यांसाठी हा एक महत्त्वाचे धडा आहे. आव्हाने येतातच, पण त्यावर विचारपूर्वक, सर्जनशीलतेने आणि नवनव्या पद्धतीने मात करता येते.

**निसर्गाशी संतुलन**

मुंग्या पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मातीला हवेची संचार प्रक्रिया (aeration) पुरवणे, ज्यामुळे मातीतील पोषणतत्त्वांचे पुनर्वापर (nutrient recycling) सुलभ होते. तसेच, मुंग्या नैसर्गिक कीटक नियंत्रणातही मदत करतात, ज्यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी होतो आणि पर्यावरणावर होणारा परिणाम मयार्देत राहतो. विद्यार्थ्यांसाठी, मुंग्यांचे हे पर्यावरणीय कार्य म्हणजे सातत्येचा आदर्शच आहे. पर्यावरणाची काळजी घेणे, कचरा कमी करणे, ऊर्जा वाचवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करणे हे विशेष गुणधर्म दिसून येतात.

**परिवर्तनाशी जुळवून घेणे**

बदल एक अपरिहार्य गोष्ट आहे. नवीन तंत्रज्ञान, बदलत्या शिक्षण पद्धती आणि जागतिक स्तरावर बदल हे सर्व विद्यार्थ्यांना अनुकूल होण्याची आवश्यकता आहे. लवचिक राहून आणि बदलांना सामोरे जात, ते त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होऊ शकतात.

मुंग्या ह्या अत्यंत अनुकूल असतात. जेव्हा अन्नाचा स्त्रोत संपतो, तेव्हा त्यांना पर्यावरणातील बदलांनुसार इतर मार्ग शोधावे लागतात आणि यामुळेच त्यांचे अस्तित्व कायम आहे.

**सततं कर्म कृत्वा साधयेत् स्वं लक्ष्यम्।**

कर्तव्य सातत्याने केल्याने, व्यक्ती आपले ध्येय साध्य करू शकते. मुंग्या अडथळ्यांना न जुमानता अन्न गोळा करण्यासाठी आणि वसाहती तयार करण्याच्या त्यांच्या दैनंदिन प्रयत्नांतून चिकाटी, सांघिक कार्य आणि शिस्त दाखवतात. त्याचप्रमाणे, विद्यार्थी मुंग्यांकडून मौल्यवान धडे शिकू शकतात, ध्येय साध्य करण्यासाठी दृढनिश्चय, संवाद, नेतृत्व आणि अनुकूलता यासारख्या गुणांचा अवलंब करू शकतात. एकूणच मुंग्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास केल्यास त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारी, विलक्षण प्रेरणादायी आहे असे दिसून येते.

■ ■ ■

# आतापासूनच उन्हाचे चटके, पाणी टंचाई... पुढे काय?

राज्यासह देशातील वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाढते वाहतूकीचे प्रमाण, सिमेंटीकरण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड यामुळे हवामानात दिवसेंदिवस आमुलाग्र बदल होत आहे. या बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस आक्राळ-विक्राळ रूप धारण करीत आहे. यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांच्यापुढे अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

बदलत्या हवामानामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत आतापासूनच उष्णतेची लाट पहायला मिळत आहे.ही राज्यासाठी व देशासाठी धोक्याचीच घंटा म्हणावी लागेल. यावरून स्पष्ट होते पुढील दिवस अत्यंत गंभीर रूप धारण करू शकतात.कारण आताच नागपूरचा पारा ४१.१ डिग्री सेल्सियसवर येवून पोहोचला आहे तर दुसरीकडे १३ मार्चला ब्रम्हपुरी येथे राज्यातील तसेच देशातील सर्वाधिक पारा ४२ अंश डिग्री सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. म्हणजेच आतापासून उष्णतामान वाढने पुढील दिवसांसाठी कठीणाई निर्माण करू शकते यालाही नाकारता येत नाही.

त्यामुळे बदलते हवामान व वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.हवामान खात्याने हेही सांगितले आहे की पुढे चालून तापमानात कमी होण्याची संभावना नसल्याने स्पष्ट सांगितले आहे. कारण १३ व १४ मार्चला विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना हीट वे ची चेतावणी देण्यात आलेली होती. म्हणजेच उष्णतेच्या बाबतीत पुढील काळ अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते. कारण होळीपुर्वीच गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील अनेक भाग उष्णतेच्या लाटेच्या तडाख्यात आहेत.

गुजरात- राजस्थान- महाराष्ट्रातील डझनभराहुन अधिक शहरांमध्ये तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडला आहे. यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत कठीण व बिकट परिस्थिती निर्माण करू शकते याला नाकारता येत नाही.सध्याच्या परिस्थितीत उष्णता वाढल्याने युवा वर्ग नदी, तलाव याठिकाणी मौजमस्ती करण्यासाठी जातात व ज्यांना पोहता येत नाही अशे युवक-युवती नदी किंवा तलावात उतरण्याचा प्रयत्न करतात.

अशावेळी मोठी दुर्घटना होऊ शकते आणि होत आहे. त्यामुळे युवकांनी नदी-तलाव यापासून सावधगिरी बाळगुन दुर रहावे कारण कोणतीही दुर्घटना सांगुन येत नाही ती केव्हाही कधीही होऊ शकते. त्यामुळे अशा दुर्घटनांपासुन वेळीच स्वतःला सावरले पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**नागपूर. ९९२१६९०७७९**

तापमान वाढल्याने आगीच्याही घटनांमध्ये सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. आतापासुन निर्माण झालेले वाढते उष्णतामान हळूहळू पाण्याच्या समस्येकडे वाटचाल करीत आहे आणि याचा फटका थोड्याच दिवसात आपणा सर्वांना भोगावा लागु शकतो यालाही नाकारता येत नाही. वाढत्या उष्णतामानामुळे त्वचेचा आजार किंवा अन्य आजाराचा धोका निर्माण होऊ शकतो. याकरीता आतापासूनच वाढते उष्णतामान पहाता स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे.

घराच्या बाहेर निघतांना कानाला व डोक्याला दुपट्टा बांधुनच निघावे, पाणी जास्तीत जास्त प्यावे व उष्णतेपासून स्वतःचा जेवढा बचाव करता येईल तेवढा बचाव अवश्य केला पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे यावर्षी उष्णतेचे प्रमाण जास्त राहा०ण्याची शक्यता हवामान खात्याकडुन वर्तवली जात आहे आणि त्याची सुरुवात वेळेच्या आधी झाल्याने मानव, पशुपक्षी व अन्य जीवजंतू यांना आतापासूनच त्याची झळ सोसावी लागत आहे. त्यामुळे सावधान वाढत्या उष्णतेपासून स्वतःही सुरक्षित रहा व पशुपक्षांनाही सुरक्षित ठेवा.

मार्च महिन्याच्या मध्यातच उन्हाच्या झळा तीव्र होत असल्याने पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. राज्यात दमदार पाऊसामुळे नद्या, तलाव, धरणात आक्टोंबर महिन्यात मुबलक पाणी साठा जमा झाले होते म्हणजेच ८८ टक्के जलसाठा होता. ही मागील पाच वर्षातील मोठी वाढ मानली जात होती. परंतु वाढते उष्णतामान पाहता जलसाठा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे ही चिंताजनक बाब आहे.

मागील पाच महिन्यांत राज्यातील जलसाठ्यात ३५ टक्क्यांनी घट होऊन ५२.७१ टक्यावर आला आहे. सध्याच्या परिस्थितीत जलसाठा कोकण ५७.६३ टक्के, मराठवाडा ५१.११ टक्के, नागपूर ४८.८३ टक्के, अमरावती ५७.३९ टक्के, नाशिक ५२.८९ टक्के, पुणे ५२.२२ टक्के इतका जलसाठा राज्यातील मुख्य धरणांमध्ये शिल्लक आहे.

पाण्याची कठीण परिस्थिती पाहता राज्यातील कोकण व पुण्यातील दहा गावांना व ९५ वाड्यांना टॅंकरने पाणीपुरवठा केला जात आहे यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण करू शकते. त्यामुळे पाण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

दरम्यान आगामी काळातील वाढते उष्णतामान, पाण्याची मागणी, बाष्पीभवनाचा वेग बघता पाणी टंचाई अत्यंत गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याकरीता सरकारने ताबडतोब नियोजन करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगुन आरोग्याची काळजी घ्यावी.

■ ■ ■

## उन्हाळ्यात कोणत्या मडक्यातील पाणी पिणे आरोग्यासाठी ठरेल फायदेशीर?
# लाल, काळा की पांढरा?

उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. उन्हाळ्यामध्ये अनेकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. उन्हाळ्यात तिव्र सूर्यप्रकाशामुळे तुम्हाला उष्मघाताच्या आणि चक्कर येण्याच्या समस्या होऊ शकतात. वाढलेल्या उष्णतेमुळे तुमच्या शरीरामधील पाणी कमी करते.

उन्हाळ्यात निरोगी शरीरासाठी तुमच्या शरीराला हायड्रेटेड ठेवणे गरजेचे असते. अनेकांना वाढलेल्या उष्णतेमुळे थंड पाणी पिण्याची सवय असते. अनेकजण रेफ्रिजरेटरच्या पाण्यापेक्षा पारंपारिक मातीच्या भांड्यातील पाणी पिण्यास पसंती देतात. त्या कारणामुळे उन्हाळ्यात अनेकजण बाजारातून मातीची भांडी आणि मडके घरी आणतात. परंतु तुम्हाला माहिती असेल की बाजारामध्ये तीन प्रकारचे मातीची भांडी उपलब्ध आहेत. अनेकवेळा तुम्हाला लाल मातीची किंवा काळ्या माती पासून बनलेल्या मडक्यांचा वापर केला जातो.



अनेक वर्षांपासून भारताच्या विविध भागांमध्ये मडक्याचा पाणी साठवण्यासाठी वापर केला जात होता. मडक्याच्या वापरामुळे पाणी नैसर्गिकरित्या थंड होते. त्यासोबतच मडक्यातून पाणी पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे देखील आहेत.

आहारतज्ज्ञ म्हणतात की, सध्या उष्णता वाढली आहे आणि बाजारात मातीच्या भांड्यांची दुकाने सजली आहेत. वेगवेगळ्या आकारांसोबतच, वेगवेगळ्या रंगांचे भांडे देखील दिसतात. बऱ्याच ठिकाणी काळ्या आणि लाल रंगाच्या भांड्यांसह पांढरी भांडी देखील दिसतात. तर, तुम्ही कोणता भांडे खरेदी करावा? याबद्दल अनेकदा गोंधळ होतो. पण, कोणत्या मातीच्या भांड्याचा वापर करणे फायदेशीर आहे.

**(उर्वरीत माहिती उद्याच्या अंकात)**

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### शितला माता संदेश

**शितला मातेच्या पूजेला**
**नैवेद्य शिळया सैपाकाचा**
**शरीर तापमान वाढू देऊनये**
**संदेश हा असे त्यांचा ...**


**शितल ठेवा डोके**
**शितल ठेवा विचार**
**टळतील संभाव्य विघ्ने**
**जीवनात येईल बहार ...**

**शिघ्र तापते ते लोखंड**
**ताऊन निघते ते गोल्ड**
**म्हणून छोट्या बाबींवर**
**भडकणे तू आता सोड ..!**

[illegible]

[illegible]

[illegible]



[illegible]



[illegible]




[illegible]



[illegible]

## शब्दकोडे क्रमांक २०६१



**आडवे शब्द :-**

१) भांडण वाढविण्याचे कृत्य
६) भावनाशून्य, निष्ठूर
९) सांभाळ, रक्षण
१०) गाडीचे छत
११) सहाय्य,
१२) तोंडी वचन किंवा करार
१५) ट, दिमाख
१६) गाण्याची कला
१८) रसवान
१९) सततचे नामस्मरण
२१) हादरा देणारी (बातमी)
२६) तृष्णा
२८) विश्रांती
२९) जनरल नॉलेज
३२) सोन्याची नाजूक सांखळी
३४) सत्ता
३६) बेकायदेशीर
३८) घट्ट
३९) कोर्ट
४१) देव
४३) उत्तराधिकारी
४५) फुलातील सुगंधी द्रव
४६) डोंगर, किल्ला
४७) गव्हाचे कणीदार पीठ
४८) लबाडीचा हेतू
४९) शिक्षक
५०) पावसाची झड
५१) वातकारक, फोपशा
५२) छाती
५४) नेत्र
५५) जबाबदारी
५६) आपला नसलेला, परकीय
५७) मामा
५९) छोटी बैलगाडी
६१) प्रजा
६३) ढीग
६५) प्रस्थान
६८) मृत्यू नसलेला
६९) ब्रह्मदेवाचे एक नाव
७१) चलनवलन
७३) फसणे
७४) मार्गक्रमण
७५) कलावंत

**उभे शब्द :-**

१) आत्तापर्यंत
२) गाणे
३) सर्वस्व
४) निकट,
५) सरोवर
६) सारख्या वजनाचे
७) विविध
८) नृत्यकलेचे दैवत
१३) चाक
१४) जेमतेम
१७) मलई
२०) वारा
२२) करार, भिस्त
२३) पाठ्यपुस्तकातील गीत
२४) पोलीस
२५) जंगली
२७) अत्यंत तीव्र व फार जुने वैर
३०) मृदा
३१) आळंदी-देहूचे संत
३३) केसांची बट
३५) एक द्विदल धान्य
३६) अवाजवी
३७) मनाने घेतलेली भीती
३९) अत्तराचा फाया ठेवण्याचे पात्र
४०) एक बिनावासाचे पांढरे फूल
४२) कणीदार (तूप)
४४) वणवा
४५) शेवट, नाश
४९) सन्माननीय, वेतन न घेता काम करणारा
५०) ताबडतोब, लागलीच
५१) घाव, प्रहार
५३) माफी मागणारा
५६) अब्रू, समाजातील वट
५८) एकतार वाद्य
६०) झकास
६२) जावळा
६४) सत्ता चालविणाऱ्यांचा समूह
६६) चणचण, उणीव
६७) मनाला टोचणार दुःख
६८) निराधार स्त्री
७०) अभिनेता
७१) कष्ट, त्रास
७२) खार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वं | दे | मा | त | र | म | | बा | ई | | सं | पा | द | की | य |
| द | | शी | र | | ग | व | त | | सं | | व | र | | था |
| न | र | | बे | का | र | | मी | न | के | त | न | | अ | र्थ |
| | पा | य | ज | मा | | ख | | वा | त | ड | | स | म | |
| व | टा | व | | पु | रा | त | न | | | का | या | पा | ल | ट |
| ऱ्हा | | न | ग | र | | रा | स | भ | | फ | | ट | | क्क |
| ड | फ | | र | ता | ळे | | न | | वा | ड | गा | | ह | र |
| | स्त | व | | मा | | वा | ख | र | | की | र | वा | ल | |
| अ | | न | र | मा | ई | | व | ण | वा | | वा | | वा | स |
| म | हा | रा | ज | | द | रो | डा | | स्त | न | | वा | ई | ट |
| सू | | ज | | अ | | ज | | आ | पु | ल | की | | | वी |
| ल | य | | बो | ग | दा | | स | म | स्त | | श | र | म | |
| | ज | हा | गी | र | दा | र | | र | | वा | | डा | | दै |
| सु | मा | र | | ब | | स | र | स | री | त | | र | वा | ना |
| धा | न | | ह | ती | | ना | व | | स | | बे | ड | र | |

## महत्त्वाचे

### परसूला शिवारात साठ हजाराची दारू जप्त

**चांदवड ।** तालुक्यातील परसूल शिवारात तिसगाव फाटा येथे नवनाथ सुभाष भगरे रा सावरगाव तालुका निफाड यांच्या मारुती सुझुकी ओमिनी वाहन (क्रमांक एम एच १५ सी डी



४४९७) या वाहनातून विना परवाना बेकायदा दारू स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी ४९७० रुपये किमतीची देशी दारू ७१ बाटल्या, ३५०० रुपये किमतीच्या १०० बाटल्या, ५६० रुपये किमतीच्या ०४ बाटल्या, ३७५ रुपये किमतीच्या डि एस पी ब्लॅक कंपनीच्या ५ बाटल्या, ७०० रुपये किमतीच्या ७ बाटल्या व ५०००० रुपये किमतीची गाडी असा एकूण ६०१०५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला अधिक तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनखाली पोलिस हवालदार ए.जी.शिरसाठ करीत आहेत.

### मनपा प्रशासनाधिकारी पाटील यांना बडतर्फ करा मनसे विद्यार्थी सेनेची मागणी

**नाशिक ।** मनपा येथे मनसे विद्यार्थी सेनेच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन नाशिक मनपा प्रशासनाधिकारी बी. टी. पाटील यांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करा अशी मनसे विद्यार्थी सेनेची मागणी केली. बी टी पाटील यांनी जवळपास ५२ अधिक शिक्षकांचे बेकायदेशीरपणे महापालिकेच्या सेवेत समायोजित केले. समायोजन करताना बिंदू नामावली तसेच महापालिकेच्या मंजूर आकृतीबंधाचा विचार न करता स्वतःच्या मनमानीने समायोजन करण्यात आले, त्यामुळे शिक्षण विभागात संतापाची लाट उफाळली आहे, जिल्हा परिषदेसह अन्य आस्थापनांमधून महापालिकेच्या सेवेत एकतर्फी वर्ग करण्यात आलेल्या शिक्षक तसेच मुख्याध्यापक व उपशिक्षकांना केंद्रप्रमुख पदी बेकायदेशीरपणे भरती दिल्याप्रकरणी शासनाकडून बी टी पाटील यांचे चौकशीचे व बदलीचे आदेश देण्यात आले आहे. अशा भ्रष्टाचारी प्रशासनाधिकारी बी. टी पाटील यांची बदली न करता यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, तसेच कोणत्या शिक्षकांकडून पदोन्नतीसाठी, केंद्रप्रमुख करण्यासाठी किती रुपये घेतले याची माहिती घेऊन त्या शिक्षकांची आणि बी.टी. पाटील यांची सुद्धा चौकशी करून याच्यात जो कोणी दोषी आढळेल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अन्यथा मनसेतर्फे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

### किर्तन शिरोमणी पुरस्काराने मुकुंद बुवा देवरस सन्मानित

**नाशिक ।** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था समाज सहाय्यक संस्था आणि सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने कीर्तनकार मुकुंद बुवा विठ्ठल बुवा देवराज नागपूरकर यांना कीर्तन शिरोमणी पुरस्काराने रविवारी (तारीख 16) सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. श्रीकृष्ण सिन्नरकर महाराज उर्फ श्रीकृष्णानंद भारती स्वामी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कैलास मठाचे स्वामी संविधान नंद सरस्वती यांच्या हस्ते पुरस्कार परशुराम सायखेडकर नाट्यगृहात प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर इस्कॉनचे नृसिंह कृपादास, आखाडा परिषदेचे मुख्य प्रवक्ता महंत भक्तीचरणदास महाराज, सतीश कुलकर्णी, लक्ष्मीकांत भट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यापूर्वी देशभक्त वासुदेव बळवंत फडके या विषयांवर राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांचे शनिवारी व रविवारी दोन दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन संस्थेमार्फत करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रेरणा बेळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष एड. अविनाश भिडे, कार्यवाह अनिल देशपांडे, कोषाध्यक्ष प्रवीण कुलकर्णी, सचिन पाडेकर, विश्वास पारनेरकर उपस्थित होते.

### वैद्यकीय विभागात २५० पदांची भरती

**नाशिक ।** महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व पंधराव्या वित्त आयोगासाठी मानधनावर २५० विविध पदांची भरती प्रक्रिया केली जात आहे. ११ महिन्यांच्या करार पद्धतीने ही भरती होत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महापालिकेच्या संकेतस्थळावर भरती प्रक्रियेसंदर्भात संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. मायक्रो बायोलॉजिस्ट एक, सर्जन एक, बालरोगतज्ञ एक, वैद्यकीय अधिकारी एक, फिजीयास्ट्रीट १४, पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी सात, अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी १६, एएनएस ५३, फार्मासिस्ट चार, लॅब टेक्निशियन सात, एक्स-रे टेक्निशियन, एक स्टाफ नर्स महिला ६७, स्टाफ नर्स पुरुष सहा, एम पी एम पुरुष ७१ याप्रमाणे मानधनावर पदांची भरती होईल.

# कुंभमेळ्यासाठी कायमस्वरूपी भूसंपादन करून प्रश्न मार्गी लावावा

## अर्थसंकल्प अनुदानावरील चर्चेदरम्यान माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची मागणी

**नाशिक ।** सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक शहरात कायमस्वरूपी भूसंपादन करून प्रश्न मार्गी लावावा आदींसह विविध मुद्यावर माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी अर्थसंकल्प अनुदानावरील चर्चेदरम्यान मागणी केली.

या चर्चे दरम्यान भुजबळ म्हणाले, गोदा आराखड्याला मंजुरी देऊन कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांना स्नानासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्यात यावे. गोदावरी पात्रात जाणारे ड्रेनेज चे पाणी थांबविण्यात यावे, त्र्यंबकेश्वर कुशावर्त कुंडात पाणी स्वच्छ करणारे यंत्र बसवावे. त्र्यंबकेश्वर मधून वाहणाऱ्या गोदावरीची देखील स्वच्छता करण्यात यावी. नाशिक शहराला टायरबेस नको तर इतर शहरांप्रमाणे रेग्युलर मेट्रो सुरू करण्यात यावी. इतर मागासवर्गीय विकास व वित्त महामंडळाचे भाग भांडवल १ हजार तर वसंतराव नाईक विकास महामंडळाचे भाग भांडवल ५०० कोटीने वाढवावा तसेच सारथी, बार्टी, महाज्योती सह सर्व संस्थांना समान निधी देण्यात यावा व ओबीसी विद्यार्थ्यांचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, भोजन भत्ता आणि निर्वाह भत्त्याचे पैसे वेळेवर देण्यात यावे यासह विविध मागण्या भुजबळ यांनी सभागृहात केल्या. अर्थसंकल्पावरील अनुदानावरील चर्चेदरम्यान भुजबळ यांनी नगरविकास आणि इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांबाबत चर्चा करून त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. यामध्ये ५ कोटी भाविक-पर्यटक येणे अपेक्षित आहे. कुंभमेळा यशस्वीरीत्या पार पाडावा यादृष्टीने मोठया प्रमाणावर दळण वळण, परिवहन, पाणी पुरवठा, राहण्याची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, विद्युतव्यवस्था, कायदा व सुव्यवस्था, वाहनतळ व्यवस्था इत्यादी सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नियोजन आणि त्याची प्रभावशाली अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाने महानगरपालिकेसह विविध विभागांचा जवळपास १५ हजार कोटींचा सिंहस्थ आराखडा शासनाला पाठविला आहे. त्याचे पुढे काय झाल अद्याप कळाले नाही. त्यामुळे या आराखड्याला लवकरात लवकर मंजुरी देण्याची आवश्यकता असल्याची मागणी त्यांनी केली. ते म्हणाले की, सिंहस्थ आराखड्यातील विविध कामांसाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून निधी प्राप्त होत असतो. सिंहस्थ कुंभमेळ्यातील सर्वाधिक महत्वाचा प्रश्न साधुग्राम आणि अन्य विकास कामांसाठी भूसंपादनाचा असतो. यासाठी आतापासून नियोजन केले तरच भूसंपादन करून त्या ठिकाणी कामे करता येतील. सिंहस्थ तोंडावर आल्यानंतर घाईघाईत कामे केली तर त्या कामांना दर्जा राहत नाही. विकासकामे दर्जेदार आणि दिर्घकालीन



होण्यासाठी ती विशिष्ट कालमर्यादेत होणे आवश्यक आहे. हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी कायमचे भूसंपादन करण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली. नमामि गोदा आराखडाबाबत शासनाने लवकर निधी मंजुर करावा. अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांनी नाशिकच्या महत्त्वाकांक्षी नमामि गोदा प्रकल्पाची घोषणा केली. गोदावरी स्वच्छतेसारख्या महत्वाच्या विषयाकडे प्राधान्याने लक्ष दिल्याबद्दल शासनाचे आभार मानले. गोदापात्रामध्ये शहर परिसरातील उद्योगांसह निवासी भागातील सांडपाणी सुद्धा मिसळत असल्याचे निदर्शनास येत आहे. पावसाळी पाण्याच्या वाहिन्यांमधूनही गोदावरी मध्ये सांडपाणी जाते. शहरातील प्रमुख ५० पैकी सुमारे २५ ठिकाणांवर ड्रेनेजचे सर्रास सांडपाणी गोदावरीमध्ये सोडले जात आहे. हे ड्रेनेजचे सांडपाणी तात्काळ बंद करून भूमिगत गटारींना जोडले जावेत. सिंहस्थामध्ये केवळ एसटीपींची संख्या वाढविणेच पुरेसे नाही तर गोदापात्रात सांडपाणी सोडणारी केंद्रे त्वरित बंद करून गोदापात्रातील पाणी दुषित होणार नाही यासाठी उपाययोजना आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाकडून कुंभमेळ्याचा विकास आराखडा मंजुर झाला नसला तरी महानगरपालिकेने १ हजार ३७४ कोटीचा मलनिःसारण आराखडा अमलात आणण्यासाठी नुकतीच निविदा प्रक्रिया राबविली. आठवडा भरापासून ही निविदा प्रक्रिया गाजत आहे. त्याला उत्तर देण्याची आवश्यकता आहे. गोदावरी स्वच्छता हा टीकेचा विषय नाही तर श्रद्धेचा विषय आहे. येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पाणी उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# ना. झिरवाळ यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीची सभासद नोंदणी सुरू



**दिंडोरी ।** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या सभासद नोंदणीस अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आला.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची राष्ट्रवादीने तयारी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सभासद नोंदणी सुरू आहे. प्रत्येक गावातील जनतेच्या विविध समस्या प्रश्न सोडविण्यासाठी गावोगाव पक्षाचे संघटन मजबूत करत सभासद नोंदणीच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांना राष्ट्रवादी परिवारात आणावे, असे आवाहन ना. नरहरी झिरवाळ यांनी केले. ज्येष्ठ नेते गणपतराव पाटील, बाळासाहेब जाधव, प्रकाश वडजे, सुरेश कळमकर, सदाशीव शेळके, शहाजी सोमवंशी, विलासराव कड, विश्वासराव देशमुख, तालुकाध्यक्ष राजेंद्र उफाडे, तालुका युवक अध्यक्ष कृष्णा मातेरे, गोकुळ झिरवाळ, महेंद्र बोरा, दत्तात्रय गटकळ, विष्णुपंत पाटील, सम्राट राऊत, मधुकर भरसट ,कचरू पाटील, दत्तू चव्हाण, संजय केदार, संजय मोरे, मधुकर बोरस्ते, सारंग घोलप, अजित कड, अतुल निगळ, लक्ष्मण बागुल, रावसाहेब जाधव, मिथुन गवळी , अशोक बुवा, पिंटू मोंढे , प्रीतम देशमुख, विनोद देशमुख,गणपत बोडके, अमोल पवार आदी उपस्थित होते.

# पिंपळनेरला शिवसेनेतर्फे (उबाठा) शिवजयंती साजरी

**पिंपळनेर ।** येथील पिंपळनेर तालुका शिवसेना (उबाठा) पक्षाच्यावतीने तिथीनुसार शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना उबाठा पक्षाचे पदाधिकारी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. दरवर्षी पिंपळनेर येथे शिवाजी महाराजांची जयंती तिथीनुसार साजरी करण्यात येते. त्यानिमित्ताने विविध उपक्रमही राबविले जातात. यावर्षी शहरातील सर्व पत्रकार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, कब्रस्तान कमिटीचे पदाधिकारी तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या बाबा फ्रेंड्स सर्कल ग्रुप या संस्थेला शाल, श्रीफळ देऊन शिवसेनेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत ही व्यक्त केले. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक, प्रताप पाटील, प्रताप पाटील, काँग्रेसचे प्रवीण चौरे, पी. एस.पाटील, पांडुरंग सूर्यवंशी, शांताराम बिरारीस, भटू पवार, जुहूर जहागीरदार, नौशाद सैय्यद, ठाकरे गट धुळे जिल्हा समन्वयक किशोर वाघ, महिला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख अलका जाधव, महिला शहर प्रमुख आर्चना चव्हाण, कैलास हिरे, तालुका समन्वयक ज्ञानेश्वर पगारे, पिंपळनेर तालुकाप्रमुख तुषार गवळी, दीपक वाणी, पिंपळनेर उपतालुका प्रमुख मनोज खैरनार, रमेश शेवाळे, पिंपळनेर शहर प्रमुख महेश वाघ, युवा सेना शहराध्यक्ष मयुर नांद्रे, अमोल क्षीरसागर, साक्री शहरप्रमुख हिंमत सोनवणे, बाबा शेख, अशोक सोनवणे, बारकू शिंदे, चिंतामन ठाकरे यांसह शहरातील ग्रामस्थ व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय साळवे यांनी केले तर आभार पिंपळनेर तालुकाप्रमुख तुषार गवळी यांनी मानले.

# बसस्थानकांच्या समस्यांबाबत बैठकीत चर्चा

## आ. फरांदे यांचा परिवहन मंत्र्यांकडे पाठपुरावा

**नाशिक ।** येथील मेळा बसस्थानक व महामार्ग बसस्थानक येथील समस्या सोडवण्याची मागणी आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमवेत आयोजित बैठकीत केली. या सर्व समस्या सोडवण्यासाठी परिवहन मंत्र्यांनी संबंधितांना सूचना दिल्या आहेत.



नाशिक येथील मेळावा बसस्थानक व महामार्ग बसस्थानक येथील समस्या संदर्भात आमदार फरांदे यांच्या मागणीप्रमाणे परिवहनमंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत विधान भवन येथे बैठक झाली. त्यावेळी फरांदे यांच्यासह महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. फरांदे यांच्या मागणीप्रमाणे नाशिक येथील मेळास्थानक व महामार्ग बस स्थानक येथील समस्या संदर्भात ना. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन चर्चा झाल्याने लवकरच मेळा बसस्थानक नवीन स्वरूपात दिसण्याच्या आशापल्लवित झाल्या आहेत. यावेळी फरांदे यांनी नव्याने विकसित केलेले मेळा बसस्थानकाची योग्य देखभाल दुरुस्ती होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करताना या ठिकाणी स्वच्छता व सुरक्षेची व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. तसेच महामार्ग बस स्थानकाचे रूप बदलणे गरजेचे असून नाशिकचे मध्यवर्ती बस स्थानक म्हणून महामार्ग बस स्थानकाचा वापर होणे गरजेचे आहे, असे स्पष्ट करताना या ठिकाणी एसटी महामंडळाची 30 हजार चौरस मीटरची जागा असून, आगामी सिंहस्थचा विचार करून या बसस्थानकाचा विकास करणे गरजेचे आहे, असे लक्षात आणून दिले. ना. सरनाईक यांनी आ. फरांदे यांनी मांडलेल्या भूमिकेचे स्वागत करताना मेळा बसस्थानकाच्या स्वच्छतेसाठी व सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्याचे आदेश दिले आपण कधी पण या बस स्थानकाला सरप्राईज भेट देऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे स्पष्ट करताना महामार्ग बस स्थानकाचा विकास बीओटी तत्त्वावर करण्यासाठी पुढील महिन्यात निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# 'अशी ही जमवाजमवी' सिनेमाचा धमाल टीझर रिलीज

**नाशिक ।** मैत्री, प्रेम, कुटुंब या विषयांवर आजवर बरेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत; मात्र राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटात फक्त तरुणांचीच नाही तर वृद्ध मित्र मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी आपल्याला अनुभवयाला मिळणार आहे. या दमदार आणि बहुप्रतीक्षित चित्रपटाचं टिझर प्रदर्शित झालंय, ज्यात अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन दिग्गजांची मजेदार जुगलबंदी पहायला मिळते. चित्रपटाचं नाव आणि रिलीझ झालेल्या टिझरवरून संपूर्ण सिनेमा पाहण्याची प्रेक्षकांची उत्सुकता आता वाढली आहे. थोडी खट्याळ, थोडी गोंडस, थोडी हळवी अशी चित्रपटाची कथा असून आजच्या तरुणाईसोबत प्रौढांनाही भावणारा, मनोरंजक आणि नवीन विचार मांडणारा हा सिनेमा आहे. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या अनुभवी कलाकारांसोबत सिनेमात सुनील



बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे अशा लोकप्रिय कलाकारांची फौज आहे. भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान देणारे चित्रपती व्ही. शंताराम यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव राहुल शांताराम यांनी मनोरंजन विश्वात सिनेप्रेमींसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचे उद्दिष्ट ठेवत 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू केलेली आहे. प्रेमाची ही नवी कहाणी कशी जमणार आहे, हे जाणून घेणं औत्सुक्याचं ठरणार आहे. 'राजकमल एंटरटेनमेंट'चा हा नवाकोरा चित्रपट १० एप्रिल २५ रोजी प्रदर्शित होत आहे.

# मालाबार गोल्ड आणि डायमंड्सची १२५ मुलींना शिष्यवृत्ती

## महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीकोनाला बळकटी

**नाशिक ।** भारतातील आघाडीचा व्यवसाय समूह आणि मालाबार गोल्ड आणि डायमंड्सचा पालक गट असलेल्या मालाबार ग्रुपने शिक्षणाच्या माध्यमातून तरुण महिलांना सशक्त बनवण्याच्या आपल्या वचनबद्धतेला आणखी दृढ केले आहे. नाशिकमधील पलाश हॉल, बीवायके कॉलेज येथे आयोजित कार्यक्रमात १२५ गुणवंत विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी एकूण १० लाख ६२ हजार रुपये वितरित करण्यात आले, जेणेकरून त्यांना आर्थिक अडचणीमुळे आपले शैक्षणिक स्वप्न अर्धवट सोडावे लागू नये. या उपक्रमाबद्दल बोलताना मालाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले, "तरुण मुलींना शिक्षण देणे हा सकारात्मक बदल घडवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. तरुण महिलांना ज्ञानाने सक्षम करणे हा उज्ज्वल भविष्यासाठी सर्वात प्रभावी मार्ग आहे. या शिष्यवृत्ती केवळ आर्थिक मदत नसून समाजाच्या उज्वल भविष्यातील गुंतवणूक




आहे. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही तरुण मुलीला आपली स्वप्ने अर्धवट सोडावी लागू नयेत, हाच यामागील उद्देश आहे."

१९९९ मध्ये स्थापन झाल्यापासून मालाबार चॅरिटेबल ट्रस्टने अनेक सामाजिक कल्याण उपक्रम राबवले आहेत. मालाबार ग्रुप आपल्या वार्षिक नफ्याच्या ५% भाग सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांसाठी समर्पित करतो, ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि दारिद्र्य निर्मूलन हे मुख्य क्षेत्र आहेत. मालाबार शिष्यवृत्ती कार्यक्रम हा समूहाच्या सीएसआर उपक्रमाचा एक प्रमुख भाग आहे. तरुण मुलींना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देऊन मालाबार ग्रुप समाजाच्या व्यापक प्रगतीस चालना देण्याचा प्रयत्न करत आहे. नाशिकमधील हा शिष्यवृत्ती वितरण समारंभ मालाबार ग्रुपच्या भारतभरातील शिक्षण आणि कौशल्य विकासास पाठिंबा देण्याच्या व्यापक उद्देशाला अधोरेखित करतो. समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या आपल्या मिशनसह, मालाबार ग्रुप भावी पिढ्यांना बळकट करण्यास आणि सर्वसमावेशक शिक्षित समाज घडवण्यास वचनबद्ध आहे.

### मालाबार गोल्ड आणि डायमंड्स बद्दल...

केरळमधील कालीकट येथे मुख्यालय असलेल्या मालाबार ग्रुपचे १३ देशांमध्ये १५ व्यवसाय क्षेत्र आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या व्यवसाय समूहांपैकी एक आहे. कंपनीचा वार्षिक व्यवसाय ६.२ अब्ज अमेरिकी डॉलर्स असून, २१,००० हून अधिक कर्मचाऱ्यांचा तो संघ आहे. स्थापनेपासूनच ईएसजी (पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासन) हे मालाबार ग्रुपचे मुख्य वचनबद्ध क्षेत्र राहिले आहे. आरोग्य, निवास, उपाशी मुक्त जग, शिक्षण, पर्यावरण आणि महिला सशक्तीकरण यावर कंपनी विशेष भर देते. सामाजिक जाणीव ठेवत आणि जबाबदारीची तत्त्वे आत्मसात करत, मालाबार ग्रुप आपली ईएसजी उद्दिष्टे सातत्याने मजबूत करतो आणि कार्यरत असलेल्या प्रत्येक देशात आपल्या नफ्याच्या ५% भाग सामाजिक उपक्रमांसाठी समर्पित करतो.






# हृदयविकाराचे 'हे' संकेत दुर्लक्षणे पडेल महागात





# मद्यपीमध्ये अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची समस्या







# हेडफोनचा मेंदूवर वाईट परिणाम


# दहा ते पंधरा टक्के लोकांमध्ये वंध्यत्व













# सेन्सेक्सने घेतली 1131 अंकांची उसळी शेअर बाजारात 2 महिन्यांतील सर्वात मोठी तेजी



**मुंबई, दि.१८ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारात आज 18 मार्च रोजी जोरदार वाढ दिसून आली. सेन्सेक्स आणि निफ्टी दोघांनीही एका महिन्यातील उच्चांक गाठला. सेन्सेक्स 1,131 अंकांच्या वाढीसह बंद झाला. निफ्टीने पुन्हा 22,800 चा टप्पा पार केला. गेल्या 2 महिन्यांतील सेन्सेक्स आणि निफ्टीमधील ही सर्वात मोठी वाढ आहे. त्यामुळे आज गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 7 लाख कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. शेअर बाजारातील ही तेजी चौफेर होती.

बीएसईचा मिडकॅप निर्देशांक 2.10 टक्क्यांनी व स्मॉलकॅप निर्देशांक 2.73 टक्क्यांनी वाढून बंद झाला. ऑटो, बँकिंग आणि मेटल शेअर्समध्ये सर्वाधिक खरेदी दिसून आली. आता मंगळवार आणि बुधवारी होणाऱ्या फेडरल रिझर्व्हच्या एफओएमसी बैठकीकडे बाजाराचे लक्ष लागले आहे. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 1,131.30 अंकांनी वाढून 75,301.26 वर बंद झाला. तर निफ्टी 325.55 अंकांनी वाढून 22,834.30 वर बंद झाला.

**सेन्सेक्स 75,301**

**निफ्टी 22,834**

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 18 मार्च रोजी 400.02 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे, जे त्याच्या मागील ट्रेडिंग दिवशी म्हणजे सोमवार, 17 मार्च रोजी 392.80 कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप 7.22 लाख कोटी रुपयांनी वाढले आहे.

सेन्सेक्समधील 30 पैकी 26 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये झोमॅटोच्या शेअर्समध्ये सर्वाधिक 7.11 टक्के वाढ झाली आहे. यानंतर ICICI बँक, महिंद्रा अँड महिंद्रा (M&M), टाटा मोटर्स आणि लार्सन अँड टुब्रो (L&T) यांचे शेअर्स 2.71 ते 3.25 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

सेन्सेक्सचे केवळ 4 शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही बजाज फिनसर्व्हचे शेअर्स 1.33 टक्क्यांनी घसरले. तर भारती एअरटेल, टेक महिंद्रा आणि रिलायन्स इंडस्ट्रीज (RIL) चे शेअर्स 0.13 टक्क्यांपासून 0.69 टक्क्यांपर्यंत घसरले.

# कन्नड भाषा अनिवार्य न केल्यामुळे नोकर भरतीची जाहिरात कर्नाटक सरकारने मागे घेतली

**बंगळुरू, दि. १८ वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात मराठी भाषेची गळचेपी होत असल्याची प्रकरणे अधूनमधून समोर येत असतात. मध्यंतरी गिरगाव येथेच एका कंपनीने मराठी लोकांनी मुलाखतीसाठी येऊ नये, असे नोकरीच्या जाहिरातीत म्हटले होते. अनेक खासगी कंपन्या मराठी माणसाला नोकरीवर घेण्यास इच्छुक नसतात, अशीही प्रकरणे समोर आलेली आहेत. याउलट परिस्थिती कर्नाटकमध्ये दिसते. कर्नाटक सरकार त्यांच्या भाषाभिमानी धोरणाला पाठिंबा देताना दिसत आहे. बंगळुरू मेट्रो रेल महामंडळाने काढलेली एक वादग्रस्त जाहिरात कर्नाटक सरकारने मागे घेण्यास भाग पाडले आहे. बंगळुरूच्या नम्मा मेट्रोमध्ये ५० लोको ऑपरेटरची जाहिरात देण्यात आली होती. उमेदवारांना कन्नड भाषेचे ज्ञान आवश्यक नसल्याचे यात म्हटले होते. कन्नड संघटनांनी यावर टीका केल्यानंतर ही भरती रद्द करण्यात आली आहे.

१२ मार्च रोजी सदर जाहिरात प्रसिद्ध झाली होती. उमेदवारांना कन्नड भाषा सक्तीची करण्यात आली नव्हती. मात्र नोकरीला लागल्यानंतर एका वर्षाच्या आत कन्नड भाषा आत्मसात करण्याची अट जाहिरातीमध्ये ठेवली गेली होती. तसेच मेट्रो रेल्वेमध्ये तीन वर्ष लोको पायलटचा अनुभव या पदासाठी अनिवार्य होता.

कन्नड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष पुरुषोत्तम बिलिमाले, कन्नड भाषेसाठी काम करणाऱ्या विविध संघटना, स्थानिक उमेदवार यांनी या जाहिरातीमधील अटीवर जोरदार आक्षेप घेतला. या जाहिरातीमुळे स्थानिक भूमिपूत्रांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच बंगळुरू मेट्रो रेल स्थानिक कन्नडीगांना डावलून बाहेरील राज्यातील उमेदवारांना नोकरीसाठी प्राधान्य देत असल्याचा आरोपही करण्यात आला.

या वादात आता कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनीही उडी घेतली आहे. त्यांनी बंगळुरू मेट्रो रेल महामंडळाला सदर जाहिरात मागे घेण्याचे आदेश दिले. एक्स अकाऊंटवर टाकलेल्या पोस्टमध्ये ते म्हणाले, "बीएमआरसीएलने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या लोको पायलट्सच्या जाहिरातमीध्ये किमान ३ वर्षांचा अनुभवाची अट ठेवली गेली होती. ही जाहिरात मागे घेण्यासंबंधी बीएमआरसीएलच्या व्यवस्थापकांना आदेश दिले असून नोकर भरतीसंदर्भात राज्य सरकारच्या नियमावलीचे पालन करण्याची सूचना दिली आहे. पारदर्शक आणि न्याय प्रतिनिधित्व मिळावे आणि कन्नडिगांचे हक्क आणि अधिकार अबाधित राहावेत, यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे."

यानंतर आता बीएमआरसीएल यांनी सदर जाहिरात मागे घेऊन राज्य सरकारच्या नियमावलीचे पालन करत स्थानिक उमेदवारांना न्याय देणारी नवी जाहिरात काढणार असल्याचे जाहिर केले आहे.

# सुनीता विल्यम्स यांचा परतीचा प्रवास सुरू

**फ्लोरिडा, दि. १८ वृत्तसंस्था**



आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात नऊ महिने राहिल्यानंतर नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी अधिकृतपणे पृथ्वीवर परतण्याचा प्रवास सुरू केला आहे. सुनीता विल्यम्स यांचा अंतराळ प्रवास फक्त आठ दिवसांकरिता होता. मात्र, बईंगच्या स्टारलाईनर अंतराळयानातील तांत्रिक समस्यांमुळे त्यांचा मुक्काम वाढला. नासाने तत्काळ दुसरी योजना आखून अंतराळवीर आता स्पेसएक्स क्रू ड्रॅगन कॅप्सूलवर परत प्रवास करत आहेत. त्यामुळे सुनीता विल्यम्स लवकरच पृथ्वीतलावर पोहोचणार आहेत.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर घरी परतताना सामान्य गुरुत्वाकर्षण परिस्थितीत पुन्हा एकत्रित होण्यापूर्वी मानक वैद्यकीय मूल्यांकनांचा समावेश असेल. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्या पृथ्वीवर परतण्याची अंतिम तयारी नासाच्या परतीच्या प्रक्रियेच्या थेट प्रक्षेपणात विल्यम्स आणि विल्मोर हे अंतराळ स्थानकावरून हॅच बंद करून खाली उतरण्याची तयारी करताना दिसले, यासंदर्भातील एक फोटोही टिपण्यात आला आहे. मंगळवारी पहाटे क्रू ड्रॅगन कॅप्सूल अंतराळ स्थानकावरून स्वायत्तपणे अनडॉक झाले, ज्यामुळे त्यांच्या नियंत्रित खाली पृथ्वीवर परत येण्याची पायरी तयार झाली.

मेक्सिकोच्या आखातातील अचूक स्प्लॅशडाउन स्थान सध्याच्या हवामान परिस्थितीवर अवलंबून असेल. लँडिंगनंतर, पुनर्प्राप्ती पथके अंतराळवीरांना टेक्सासमधील ह्युस्टन येथील नासाच्या जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये घेऊन जातील, जिथे त्यांचे नियमित वैद्यकीय मूल्यांकन केले जाईल.

या पोस्ट-मिशन प्रक्रिया दीर्घकाळ अंतराळ प्रवासाचे त्यांच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत, ज्यामध्ये स्नायू शोष, द्रवपदार्थ बदल आणि सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाच्या प्रदर्शनामुळे संभाव्य दृष्टी बदल यांचा समावेश आहे.

# बंदुकीचा धाक दाखवून व्यापाऱ्याला दिवसाढवळ्या 80 लाखांना लुटले

**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीमधील लाहोरी परिसरात दिवसाढवळ्या मोठा दरोडा पडल्याची घटना घडली आहे. एका व्यावसायिकाला बंदुकीचा धाक दाखवून तब्बल ८० लाख रुपये लुटण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे दिल्लीत मोठी खळबळ उडाली आहे. चोरट्याने व्यावसायिकाचा आधी पाठलाग केला आणि त्यानंतर बंदुकीचा धाक दाखवून लुटलं. ही संपूर्ण घटना लाहोरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हवेली हैदर कुली चांदणी चौकात घडल्याची माहिती सांगितली जात आहे.

दरम्यान, व्यापाऱ्याला लुटल्याची ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या घटनेचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत व्यापाऱ्याला कसं लुटलं? याचा संपूर्ण घटनाक्रम कैद झाला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने व्यापाऱ्याकडून रोख रक्कम भरलेली बॅग हिसकावून घेण्याच्या आधी गोळीबार केला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेल्याचं दिसत आहे. या घटनेच्या व्हिडीओमध्ये एक मुखवटा घातलेला व्यक्ती एका व्यापाऱ्याचा पाठलाग करत असल्याचं दिसून येत आहे. त्यानंतर अचानक आरोपी बंदूक काढतो आणि व्यापाऱ्याला रोख रक्कम भरलेली बॅग देण्याची मागणी करतो. यानंतर कोणताही प्रतिकार न करता व्यापाऱ्याने पैशाने भरलेली बॅग दिल्याचं दिसत आहे, त्यानंतर हल्लेखोर ते पैसे घेऊन घटनास्थळावरून पळून जाताना दिसत आहे. हा सर्व प्रकार घडत असताना अनेकजण पाहत होते. पण कोणीही यामध्ये मदतीला आलेलं दिसत नाही. या घटनेनंतर व्यावसायिकाने तात्काळ पोलीस ठाणे गाठून याबाबत पोलिसांत तक्रार केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तसेच पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज देखील ताब्यात घेतले आहेत.

# "नरेंद्र मोदी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुनर्जन्म"

## भर लोकसभेत भाजपा खासदाराचा अजब दावा

**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीदरम्यान खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपला जन्म झाला नसून आपल्याला देवानंच पाठवल्याचा दावा करणारं विधान केलं होतं. यावरून विरोधकांनी मोठी टीका-टिप्पणी केली होती. लोकसभा आणि त्यापाठोपाठ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतही हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला होता. यानंतर आता भाजपा खासदारानं थेट लोकसभेत बोलताना केलेल्या विधानावरून टीका होत आहे. मोदी पूर्वजन्मात छत्रपती शिवाजी महाराज होते, असा दावा त्यांनी केला आहे!

भाजपाचे ओडिशातील खासदार प्रदीप पुरोहित यांनी मंगळवारी लोकसभेत बोलताना हे विधान केल्यानंतर त्यावरून विरोधकांनी आगपाखड सुरू केली आहे. त्याचबरोबर नेटिझन्सकडूनही प्रदीप पुरोहित यांच्यावर टीका-टिप्पणी केली जात आहे. भारतीय जनता पक्षानं या विधानाबद्दल माफी मागायला हवी, अशी मागणीही विरोधकांकडून केली जात आहे.



सोशल मीडियावर लोकसभेतील पुरोहित यांच्या विधानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. "देशाला एक शक्तिशाली राष्ट्र बनवण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला आहे. माझ्या बारगढ मतदारसंघात गिरीजा बाबा नावाचे एक संत राहतात. त्यांनी मला एक दिवस बोलताना सांगितलं की देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पूर्वजन्म हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा होता. त्यांचा दुसरा जन्म मोदी आहे. त्यामुळे या देशाला जगात सर्वात शक्तिशाली राष्ट्र करण्याच्या हेतूने ते काम करत आहेत", असं विधान पुरोहित यांनी केलं.

दरम्यान, पुरोहित यांच्या विधानाचे तीव्र पडसाद विरोधकांप्रमाणेच नेटिझन्समध्ये उमटल्याचं पाहायला मिळत आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान असल्याचा दावा काही नेटिझन्सनं केला आहे. तसेच, मोदींची शिवाजी महाराजांशी तुलना करणं अयोग्य असल्याचीही प्रतिक्रिया नेटिझन्स व्यक्त करत आहेत.

काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी या विधानावरून टीका केली आहे. "अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारंवार अपमान करण्याचे आणि महाराष्ट्रातील तसेच जगभरातील शिवप्रेमींची अस्मिता दुखावण्याचे नियोजनबद्ध कारस्थान भाजपच्या नेतेमंडळींकडून केले जात आहे. या लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा मानाचा जिरेटोप नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर ठेवून शिवरायांचा घोर अपमान केला. आणि आता या भाजपा खासदाराचे हे घृणास्पद वक्तव्य ऐका", अशी पोस्ट करत वर्षा गायकवाड यांनी लोकसभेतील व्हिडीओ शेअर केला आहे.

# नारळाच्या झावळ्या पासून सुंदर कलाकृती

**मुलखावेगळी माणसं**



प्रत्येक व्यक्तीला छंद असतो, कुणाला दुर्मिळ फोटो संग्रहित करण्याचा, कुणाला एतिहासिक नाण्यांचा तर कुणाला प्रसिद्ध व्यक्तींच्या स्वाक्षरी जपण्याचा! पण कुडाळ तालुक्यातील आंदुर्ले गावात राहणाऱ्या अनिल परब यांना वेगळाच छंद आहे, तो म्हणजे नारळाच्या झावळ्यापासून विविध कलाकुसरीच्या वस्तू बनवून त्यांची जपणूक करण्याचा! नारळाच्या झावळ्यापासून टोपी, टोपल्या, मखर तर सोडणांपासून पक्ष्यांच्या कलाकृती अनिल परब बनवितात. ही त्यांची कला आता सिंधुदुर्ग जिल्ह्याबाहेरही पोहोचली आहे.

अगदी सामान्य कुटुंबातले असलेले अनिल परब यांची नारळाची बाग आहे. नारळाच्या झावळ्या, करवंटी, सोडण या प्रामुख्याने टाकाऊ घटकांमध्ये येतात. परंतु, याच झावळ्या, सोडणपासून अनिल परब यांनी आपला छंद जोपासत वेगवेगळ्या कलाकृती बनविल्यात. यामध्ये टोपी, पक्षी, टोपल्या, मखर, कंदील, गणपती सणात डेकोरेशन आदींचा समावेश आह. अनिल परब यांनी झावळ्यापासून बनविलेल्या टोप्या अगदी अमेरिकेत पोहचल्या आहेत. या टोप्या अगदी टिकाऊ असून सहज ५ ते ६ महिने टिकतात. मुख्य म्हणजे अनिल परब यांच्या कलाकृती सोशल मीडियावर सुद्धा व्हायरल झाल्याने अनेक पर्यटक, जिल्ह्यातील नागरिक आंदुर्ले या गावी येऊन या वस्तू विकतही घेतात. तर अनिल परब या वस्तू अनेक जणांना कोणताही मोबदला न घेता देतात. म्हणजेच अनिल परब यांचा हा छंद त्यांचे आर्थिक साधनही बनले आहे.

**लोकमानस**

अनिल परब यांना कलाकुसरीच्या वस्तू बनविण्याचा छंद होता. मात्र, हा छंद मर्यादित राहिला होता. त्यांच्या आंदुर्ले या गावी ४ ते ५ वर्षापूर्वी नारळ प्रशिक्षण होते. अनिल परब या प्रशिक्षणासाठी गेले होते. पण प्रशिक्षणासाठी वय मर्यादा असल्याने त्यांना त्यात पूर्णवेळ सहभाग घेता आला नाही. यातील काही मोजके प्रशिक्षण त्यांना मिळाले. त्यानंतर अनिल परब यांनी आपली या छंदाला वेगळी वाट निर्माण करून देताना नारळाच्या झावळ्यापासून वेगवेगळ्या कलाकुसरी बनविल्या. अनिल परब यांनी झावळ्यापासून पंढरीचा पांडुरंग सुद्धा साकारला आहे. येत्या काळात त्यांना याही पेक्षा वेगवेगळ्या कलाकृती साकारायाच्या आहेत.

काही दिवसांपूर्वी परब यांचा झावळ्यापासून वस्तू बनविण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यातूनच अमेरिकेत राहणारे पण मूळ भारतीय असलेले पर्यटक अनिल परब यांच्या निवासस्थानी आले. त्यांनी अनिल परब यांच्या कडील वस्तू खरेदी करून अमेरिकेत नेल्या. तर रत्नागिरी, गोवा, मुंबई, बेळगाव येथील काही नागरिकांना अनिल परब यांच्याविषयी माहिती समजली. त्यांनी सुद्धा अनिल परब यांच्या घरी येऊन त्या खरेदी केल्या.अनेक लोक त्यांच्या घरी येऊन त्या विकत घेतात. पण अनिल परब हेब्या वस्तू कोणतेही पैसे न घेता देतात. पण काही हौसी लोक अनिल परब यांना यांचा आर्थिक मोबदला देतात. माडाच्या झावळ्यापासून या वस्तू बनविणे माझा छंद आहे. मी या वस्तू नागरिकांना निःशुल्क देतो. पण काही नागरिक पैसे देतात. एकूणच,नैसर्गिक नारळाच्या झावळ्या पासून सुंदर कलाकृती बनविणारा अनिल परब सारखा अवलिया हा मुलखावेगळा माणूसच ठरतो.

# जीप इंडियाची एक्सक्लुझिव्ह कंपास सँडस्टॉर्म एडिशन

**चलती का नाम गाडी**

जीप इंडिया जीप कंपास सँडस्टॉर्म एडिशन लाँच करून साहसाची भावना पुन्हा जागृत करत आहे, ही एक अनोखी आणि विशेष ॲक्सेसरी पॅकेज आहे जी मजबूतपणा आणि प्रीमियम शैलीचे मिश्रण शोधणाऱ्यांसाठी डिझाइन केलेली आहे. कंपासचे एक धाडसी अर्थ लावणारा, हा मर्यादित-आवृत्ती प्रकार उत्साही लोकांसाठी तयार केला आहे ज्यांना त्यांची जीप रस्त्यावर आणि बाहेर दोन्ही ठिकाणी वेगळी दिसावी असे वाटते. कंपास सँडस्टॉर्म एडिशन आयकॉनिक जीप स्टाइलिंगला पुढील स्तरावर घेऊन जाते, हूड आणि बाजूंवर कस्टम सँडस्टॉर्म-थीम असलेले डेकल्स तिची आकर्षक उपस्थिती वाढवतात.



यात अतिरिक्त आरामासाठी प्रीमियम सीट कव्हर्स आणि प्रोग्रामेबल ॲम्बियंट लाइटिंग, वाढीव सुरक्षिततेसाठी फ्रंट आणि रीअर डॅश कॅम्स, कार्पेट आणि कार्गो मॅट्स आणि मॉडेलची विशिष्टता दर्शविणारा एक खास सँडस्टॉर्म बॅज यासारख्या अत्याधुनिक तपशीलांचा समावेश आहे.

लाँचिंगबद्दल बोलताना, जीप इंडियाचे ब्रँड डायरेक्टर कुमार प्रियेश म्हणाले: "जीप कंपास सँडस्टॉर्म एडिशन ही खास ऑफरसह जीप उत्साहींना उत्तेजित करण्याची आमची वचनबद्धता कायम ठेवते. ही आवृत्ती साहसी भावनेकडे आकर्षित झालेल्या आणि त्यांच्या शैलीची अद्वितीय भावना प्रतिबिंबित करणारे वाहन शोधणाऱ्या ग्राहकांशी पूर्णपणे जुळते. त्याच्या मजबूत डिझाइन सुधारणा, प्रीमियम ॲक्सेसरीज आणि कस्टमायझेशन पर्यायांसह, सँडस्टॉर्म एडिशन जीपच्या मालकीचे आकर्षण वाढवते, जे वेगळे दिसू पाहणाऱ्यांसाठी खरोखर वैयक्तिकृत अनुभव देते."

# औरंगजेबाच्या कबरीचा वाद हे निव्वळ राजकारण आहे का?

**वाद संवाद**

**१] विजय मोदड**
**[ इतिहास अभ्यासक ]**

एक आठवड्यापूर्वी समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी काहीही कारण नसताना इतिहासाची मढी उकरून विनाकारण औरंगजेबाचे उद्दात्तीकरण आपल्या एका भाषणात केले,आणि तिथूनच खऱ्या अर्थाने मग औरंगजेबाचा विषय त्याच्या अहिल्यानगरात असलेल्या कबरी पर्यंत पोहचला. अनेक हिंदुत्ववादी संघटना भडकल्या आणि महाराष्ट्रातून औरंगजेबाची कंबर हटविण्याची मागणी मागील काही दिवसापासून जोर धरू लागली आहे. मात्र या संघटनापाठी विविध राजकीय पक्षांचे लोक आहेत आणि तेच आपल्या स्वार्थासाठी लोकांची माथी भडकविण्याचे पाप करत आहेत. वास्तविक पाहता शिवकालीन इतिहासाला आता ३५० वर्ष उलटून गेली आहेत,मात्र याच इतिहासातीळ मढी उकरून हिंदू मुस्लिम वाद या राजकारण्यांना घडवायचा आहे.

**२]वैशाली जाधव**
**[शिवसैनिक ]**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत आणि त्यांच्या सारख्या निधड्या छातीच्या योध्यानेच जुलमी मोगलांच्या राजवटीतून स्वकीयांची सुटका करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आहे. तत्कालीन ज्या ज्या मुघलांनी मराठ्यांवर ,त्यांच्या स्त्रियांवर अन्याय अत्याचार केले अशा मोघलांमध्ये औरंगजेब हा सर्वात क्रूर आणि पाशवी असा मुघल होता. त्यांनी शंभुराजांना देखील कैदेत टाकून धर्म बदलण्यासाठी त्यांचा अनन्वित छळ केला हे इतिहासात नमूद आहे. असा जुलमी औरंगजेबाची कंबर महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत नकोच हीच सर्व हिंदू बांधवांची मागणी आहे आणि ती अतिशय योग्य आहे असे मला वाटते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पीएम मोदींनी महाकुंभात मृत्यूमुखी पडलेल्या भाविकांना श्रद्धांजली वाहिली नाही; राहुल गांधींची टीका

**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज संसदेत महाकुंभाच्या भव्य आयोजनाबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले की, गंगा नदीला पृथ्वीवर आणण्यासाठी मोठा प्रयत्न केला गेला, हे आपणा सर्वांना माहीत आहे आणि तेच महाकुंभाच्या महान प्रयत्नात दिसून आले. मात्र दुसरीकडे पंतप्रधान मोदींच्या भाषणावर विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी निशाणा साधला. पंतप्रधान सभागृहात बोलणार होते, त्याची माहिती वेळेत दिली गेली नाही, असा आरोप काँग्रेस पक्षाने केला.

या संपूर्ण मुद्द्यावर विरोधकांना बोलू दिले जात नसल्याचा आरोप काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला. ते म्हणाले की, हा कसला नवीन भारत? पंतप्रधान मोदींनी देशातील बेरोजगारीबाबतही बोलायला हवे होते, मात्र ते यावर काहीही बोलले नाहीत. पंतप्रधान मोदींनी महाकुंभमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या भाविकांना श्रद्धांजली वाहायला हवी होती, पण त्यांनी तसे केले नाही.

संसद संकुलात पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, कुंभ ही आपली परंपरा, इतिहास, संस्कृती आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी कुंभमध्ये ज्यांना जीव गमवावा लागला त्यांच्याबद्दल काहीही बोलले नाही, अशी आमची तक्रार आहे. कुंभला जाणाऱ्या तरुणांना पंतप्रधानांकडून रोजगार हवा आहे, पण पंतप्रधानांनी रोजगाराबाबत एक चकार काढला नाही, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

दरम्यान, पंतप्रधान मोदींनी संसदेत महाकुंभाच्या आयोजनाबद्दल आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, मी लाल किल्ल्यावरुन सर्वांच्या प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले होते. संपूर्ण जगाने महाकुंभाच्या रुपाने भारताची भव्यता पाहिली. हे सर्वांच्या प्रयत्नांचे खरे यश आहे. गेल्या वर्षी अयोध्येतील राममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात देश हजार वर्षांसाठी कसा तयार होत आहे, याची जाणीव झाली होती. बरोबर एक वर्षानंतर महाकुंभाने आपल्या सर्वांच्या या विचाराला आणखी बळ दिले. देशाची ही सामूहिक जाणीव देशाची ताकद दाखवते, असं मोदी यावेळी म्हणाले.

# अहमदाबादमध्ये फ्लॅटमध्ये सापडले 95 किलो सोने अन् रोकड!

**अहमदाबाद, दि. १८ वृत्तसंस्था**

गुजरातच्याअहमदाबादमध्ये एका बंद खोलीत मोठं घबाड सापडल्याने खळबळ उडाली आहे. अहमदाबादमधील एका बंद फ्लॅटवर टाकलेल्या छाप्यात ९५ किलोहून अधिक सोने आणि लाखो रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. एवढ्या मोठ्या प्रमाणात सोने आणि रोख रक्कम बंद खोलीत सापडल्याने कारवाईसाठी आलेले अधिकारीही चक्रावून गेले. जप्त करण्यात आलेले सोने आणि रोख रकमेची एकूण किंमत सुमारे ९० कोटी रुपये आहे.

महसूल गुप्तचर संचालनालय आणि दहशतवाद विरोधी पथकाने अहमदाबाद शहरातील पालडी भागातील स्टॉक मार्केट ऑपरेटरच्या रिकाम्या फ्लॅटवर ही कारवाई करण्यात आली. या छाप्यात पथकाला स्टॉक ब्रोकरच्या बंद फ्लॅटमधून ९५ किलो सोने, मोठ्या प्रमाणात दागिने आणि बरीच रोकड जप्त करण्यात आली आहे. तपास यंत्रणा आणि पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर हा छापा टाकण्यात आला. २५ अधिकाऱ्यांनी सोमवारीदुपारी शेअर मार्केट ऑपरेटरच्या पालडी येथील आविष्कार अपार्टमेंटमधील फ्लॅट क्रमांक १०४ वर छापा टाकला. या फ्लॅटचे मालक महेंद्र शहा आणि मेघ शहा नावाच्या व्यक्ती असल्याची माहिती समोर आली आहे. गुजरातमध्ये गेल्या काही दिवसातील ही सर्वात मोठी कारवाई आहे. तपास अधिकाऱ्यांना फ्लॅटमध्ये एक बंद बॉक्स सापडला होता. तो उघडल्यावर छापा टाकण्यासाठी आलेले अधिकारीही थक्क झाले. मोठ्या प्रमाणावर सोने सापडल्यानंतर त्याचा व्हिडीओ कॅमेऱ्यात कैद करण्यात आला.

# नोकराचा कारनामा! 4 दिवसांपूर्वीच कामावर आला अन् एक कोटीच्या दागिन्यांवर डल्ला मारून गेला

**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था**

राजधानीतील शाहदरा भागातील एका घरातून १ कोटी रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन पळून गेलेल्या नोकर आणि त्याच्या मित्राला पोलिसांनीअटक केली आहे. सुरेश मलिक उर्फ नागार्जुन आणि त्याचा साथीदार रोहित कुमार मलिक अशी अटक केलेल्या आरोपींची नावं आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरीला गेलेली रोकड आणि दागिने जप्त केले आहेत. तपासादरम्यान पोलिसांना कळलं की दोघांविरुद्ध यापूर्वीही असेच गुन्हे दाखल आहेत.

डीसीपी प्रशांत गौतम यांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ मार्च रोजी शाहदरा पोलिसांना तक्रार मिळाली. तक्रारदार संजय गुप्ता यांनी पोलिसांना सांगितलं की, चार दिवसांपूर्वी त्यांनी एका प्लेसमेंट एजन्सीमार्फत नागार्जुन नावाच्या नोकराला कामावर ठेवलं होतं. त्याचं पोलीस व्हेरिफिकेशनही झालं नव्हतं. त्याने घरी काम करायला सुरुवात केली. याच दरम्यान १४ मार्च रोजी कुटुंब होळी साजरी करण्यासाठी गुरुग्रामला गेलं होतं. १५ मार्च रोजी दुपारी ते घरी आले तेव्हा चोरी झाल्याचं उघडकीस आलं.

घरातून सहा लाख रोख रक्कम आणि सुमारे एक कोटी किमतीचे सोन्याचे, हिऱ्यांचे दागिने गायब असल्याचं आढळून आलं. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. डीसीपीच्या म्हणण्यानुसार, १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपीच्या हालचाली तपासण्यात आल्या आणि शोध घेण्यात आला.

आरोपीचे ओळखपत्रही बनावट असल्याचं आढळून आलं. बऱ्याच प्रयत्नांनंतर पोलीस पथकाने दिल्लीतील लाडो सराई येथून नागार्जुनला अटक केली. नंतर त्याचा दुसरा साथीदार रोहित कुमार मलिक याला अटक करण्यात आली. दोघेही ओडिशाचे रहिवासी आहेत. पोलिसांनी आरोपींकडून चोरीला गेलेला मालही जप्त केला आहे.

# पाकिस्तानची 'हाराकिरी' कायम, न्यूझीलंड विरुद्ध दुसऱ्या टी-20 सामन्यातही नामुष्कीजनक पराभव

**ड्युनेडिन, दि. १८ वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट संघाची पराभवाची मालिका आजही कायम राहिली. नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी न्यूझीलंड संघाने तिरंगी एकदिवसीय मालिकेत दोन्ही सामन्यांमध्ये पाकिस्तानला पराभूत केले होते. यानंतर, २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी सामन्यातही पाकिस्तानला न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला होता. आता पाकिस्तान संघाने टी-२० मालिकेतील दुसरा सामनाही गमावला आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत न्यूझीलंडने 2-0 अशी आघाडी घेतली आहे. आजच्या सामन्यात टिम सेफर्ट सामनावीर ठरला.



ड्युनेडिन येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामना हा पावसाच्या व्यत्ययामुळे १५ षटकांचाच झाला. नाणेफेक जिंकून न्यूझीलंडचा कर्णधार मायकेल ब्रेसवेलने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघाने ९ गडी गमावात १३५ धावांपर्यंत मजल मारली. कर्णधार सलमान अली आघा याने २८ चेंडूत ५६ धावांची खेळी केली. तर उपकर्णधार शादाब खानने १४ चेंडूत २६ धावा केल्या. शाहीन शाह आफ्रिदीने १४ चेंडूत २२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकडून जेकब डफी, बेन सीयर्स, जेम्स नीशम आणि ईश सोधी यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

न्यूझीलंडने १३६ धावांचे लक्ष्य अवघ्या १३.१ षटकात पूर्ण केले. विशेष म्हणजे न्यूझीलंड संघाला पहिल्या षटकात एकही धाव मिळाली नव्हती. तरीही संघाने १३.१ षटकात ५ गडी गमावून सामना जिंकला. न्यूझीलंडकडून टिम सेफर्टने २२ चेंडूत ४५ धावा केल्या. फिन ॲलनने १६ चेंडूत ३८ धावा केल्या. मिचेल हेने १६ चेंडूत २१ धावा केल्या. हरिस रौफने दोन, तर मोहम्मद अली, खुसदिल शाह आणि जहानाद खानने प्रत्येकी एक विकेट घेतली.

मालिकेतील तिसरा सामना शुक्रवार २१ मार्च रोजी ऑकलंडमध्ये खेळला जाईल. या मालिकेत आपलं आव्हान जिवंत ठेवण्यासाठी पाकिस्तानला हा सामना जिंकावा लागले. हा सामना जिंकला तर यजमान न्यूझीलंड मालिका जिंकेल.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com